


पाक्षिक
# मनोगत
प्रदेश बीजेपी

मुंबई ● वर्ष: 7 ● अंक: 20 ● 16 ऑक्टोबर 2025 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.







# अर्थव्यवस्थेच्या सुवर्ण युगाचा प्रारंभ



# शेतकऱ्यांचे ‘देवाभाऊ’





## अध्यक्षीय मनोगत

# निवडणुकांसाठी सज्ज व्हा...

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होतील. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा विषय न्यायालयातील सुनावणीमुळे लांबणीवर पडला होता. आता या निवडणुका होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महापालिका, नगरपालिका, नगर पंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्या निवडणुका राज्यातील राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असतात. यामुळेच आपल्याला या निवडणुकांच्या तयारीसाठी झोकून देऊन काम करावे लागणार आहे. या निवडणुकांच्या तयारीसाठी संघटनात्मक आढावा बैठका नुकत्याच पार पडल्या आहेत. सर्व विभागात झालेल्या या बैठकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जातीने उपस्थित होते. या निवडणुका पक्षीय पातळीवर आणि पक्षाच्या चिन्हावर होणार असल्याने आपल्या दृष्टीने या निवडणुका प्रतिष्ठेच्या आहेत. सर्वसामान्य कार्यकर्त्यांना या निवडणुकांच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात सहभागी होण्याची संधी मिळते. ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात नवे नेतृत्व तयार होण्याच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना महत्वाचे स्थान आहे. तालुका, जिल्हा पातळीवर आपल्या कर्तृत्वाची चमक दाखवून राज्य स्तरावर काम करण्यासाठी या निवडणुकीतून नेतृत्व आकाराला येत असते. २०१६-१७ मध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने सर्वाधिक जागा जिंकत नवा विक्रम केला होता. पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, नागपूर, सोलापूर, सांगली, धुळे, जळगाव, अकोला अशा अनेक महापालिका भारतीय जनता पार्टीने स्वबळावर जिंकल्या होत्या. १००च्या वर नगरपालिकांमध्ये भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष थेट निवडणुकीत विजयी झाले होते. अनेक जिल्हा परिषदाही आपण स्वबळावर जिंकल्या होत्या. यावेळीही आपल्याला मागच्याच कामगिरीची पुनरावृत्ती करायची आहे. खेडेगाव, तालुका, शहर, महानगर अशा विविध पातळ्यांवर पक्षाचे काम करणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला या निवडणुकीतून आपले संघटन कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण आणि नागरी प्रश्न सोडविण्यासाठी आपली पक्ष संघटना किती सक्षम आहे, हे मतदारांना दाखविण्यासाठी या निवडणुका उपयुक्त ठरणार आहेत. न्यायालयातील सुनावणीमुळे साडेतीन वर्षे या निवडणुका लांबल्या होत्या. आपण संपूर्ण ताकदीने या निवडणुकीत उतरणार आहोत. या निवडणुका महायुती म्हणून लढवायच्या की स्वबळावर लढवायच्या या निर्णय वरिष्ठ पातळीवर योग्य वेळी घेतला जाईल. कार्यकर्त्यांनी त्याचा विचार न करता आतापासून तयारीला लागले पाहिजे. या निमित्ताने आपला मतदारांशी पुन्हा थेट संपर्क होणार आहे. त्याचा उपयोग करत केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती आपण मतदारांपर्यंत पोहचवली पाहिजे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकी एवढेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीलाही महत्व आहे. मोदी सरकारने ग्रामीण भाग शेतकऱ्यांच्या विकासासाठी गेल्या ११ वर्षात अनेक योजना हाती घेतल्या आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या विकास योजनांची गती कायम राखण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही आपला विजय होणे आवश्यक आहे. पक्ष संघटना देईल तो उमेदवार मान्य करून आपण निवडणुकीच्या प्रचारात कार्यरत झाले पाहिजे. आपल्या पक्षात कर्तृत्व आणि पक्षाशी असलेली निष्ठा याचा विचार करूनच संधी दिली जाते, हे लक्षात ठेवून एकदिलाने आपण निवडणुकीच्या लढाईत उतरण्याचा निर्धार केला पाहिजे.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे


पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

शेतक-यांचे 'देवाभाऊ' ०४



भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुवर्ण युगाचा प्रारंभ ०७



अर्थव्यवस्थेची दमदार वाटचाल आणि स्वदेशीचा जागर १६



जीएसटी बूस्ट: सप्टेंबरमध्ये ट्रॅक्टर विक्रीत 45% वाढ! १८



उबाठांनी अडवली, देवेंद्रजींनी प्रत्यक्षात आणली मुंबई मेट्रो - ३ ची विजयगाथा २०



उद्धव ठाकरेंना शहरी नक्षलवाद्यांचा कळवळा! २२



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# शेतक-यांचे 'देवाभाऊ'



> ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्याच्या काही भागांत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. सोयाबीनसारखी हाताशी आलेली नगदी पीके अतिवृष्टीमुळे, महापुरामुळे भुईसपाट झाली. गाई-म्हशी यासारखी शेतकऱ्यांना जोडधंद्याचा आधार देणारी जनावरे महापुरात वाहून गेली. अचानक आलेल्या महापुरामुळे घरात पाणी शिरून हजारो लोकांचे संसार वाहून गेले.

हजारो शेतकऱ्यांची जमीन अक्षरश: खरवडून निघाली. या अस्मानी संकटामुळे राज्यातील शेतकरी हतबल झाला. मोठ्या कष्टाने घेतलेली पिके नष्ट झाल्यामुळे 'उद्या खायचं काय', असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे निर्माण झाला. संकटात सापडलेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मदतीचा आधार दिसत होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना तत्काळ मदत म्हणून ३२०० कोटींचा निधी तातडीने वितरीत केला. केंद्र सरकारकडे नुकसानीची माहिती घेऊन मदतीसाठी प्रस्ताव सादर करण्याची विशिष्ट प्रक्रिया असते. ही प्रक्रिया पूर्ण करेपर्यंत बराच वेळ लागला असता. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने सुमारे ३२ हजार कोटींचे मदतीचे पॅकेज जाहीर केले. शेतकऱ्यांना जाहीर केलेली ही मदत अनेक अर्थाने ऐतिहासिक आहे. देशात आजवर कोणत्याच सरकारने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना एवढी मदत दिली




नव्हती. राज्य सरकारची मदत कोणत्याही परिस्थितीत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, या दृष्टीने देवेंद्र फडणवीस यांनी नियोजन केले आहे. हे मदत पॅकेज जाहीर करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीचा विविध अंगांनी बारकाईने विचार केला आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर प्रथमच शेतकऱ्यांना अतिवृष्टी आणि महापुराच्या रौद्र आपत्तीला तोंड द्यावे लागत आहे. अतिवृष्टी आणि महापुरामुळे ६८ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. राज्यातील २९ जिल्हे, २५३ तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी आणि महापुराचा फटका बसला आहे. शेतजमीन वाहून जाणे, घरा-दारात पाणी शिरून संपूर्ण संसार वाहून जाणे अशा पद्धतीचे संकट महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी प्रथमच अनुभवले आहे. या संकटाची व्यापकता लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मदतीचे पॅकेज तयार केले आहे. त्यामुळेच राज्यातील शेतकऱ्यांसाठी देवेंद्र फडणवीस हे खऱ्या अर्थाने 'देवाभाऊ' ठरले आहेत, असे म्हणण्याशिवाय तरणोपाय नाही.

देवेंद्र फडणवीस यांच्या २०१४ पासूनच्या मुख्यमंत्रीपदावरील कारकिर्दीचा आढावा घेतला असता श्री. फडणवीस हे राज्यातील बळीराजाचे तारणहार असल्याचे सिद्ध झाले आहे. राज्य सरकारच्या पॅकेजअंतर्गत कोरडवाहू, बागायती आणि फळबागा असलेल्या जमिनींच्या नुकसानीपोटी वेगवेगळ्या प्रमाणात थेट आर्थिक मदत दिली जाणार आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांना १८ हजार ५०० रुपये प्रति हेक्टर याप्रमाणे मदत केली जाणार आहे. हंगामी बागायती पिकांना हेक्टरी २७ हजार ५०० रुपये तर बागायती शेतकऱ्यांना ३२ हजार ५०० रुपये प्रति हेक्टर याप्रमाणे अर्थसहाय्य केले जाणार आहे. हे अर्थसहाय्य शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात जमा होण्यास सुरुवातही झाली आहे. यामुळे त्यासाठी शेतकऱ्यांना सरकारी अधिकारी, लोकप्रतिनिधींच्या दारापुढे जाण्याची आवश्यकता नाही. ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा काढलेला आहे अशा शेतकऱ्यांना तसेच पूर्ण नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना



पायाभूत सुविधांच्या दुरुस्तीकरीता १० हजार कोटींचा निधी जाहीर करण्यात आला आहे. वाहून गेलेल्या दुभत्या जनवारांसाठी ३७ हजार ५०० रुपये प्रति जनावर, ओढकाम करणाऱ्या जनावरांसाठी ३२ हजार रुपये प्रति जनावर, कुक्कुट पालनाचा जोडव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति कोंबडी १०० रुपये या पद्धतीने मदत केली जाणार आहे. महापुरामुळे अनेकांच्या घरांची पडझड झाली. काही ठिकाणी घरे पूर्णपणे उद्धवस्त झाली. अशी घरे केंद्र सरकारच्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत नव्याने बांधली जाणार आहेत. फळबागायतदारांना हेक्टरी २७ हजार रुपये प्रमाणे मदत केली जाणार आहे. महापुरामुळे नुकसान झालेल्या दुकानदारांना ५० हजार रुपये एवढे अर्थसहाय्य केले जाणार आहे. दुष्काळ आणि टंचाईस्थितीमध्ये सरकारकडून ज्या सवलती दिल्या जातात त्या सर्व सवलती या संकटातही

आणखी १७ हजार रुपयांची अतिरिक्त मदत केली जाणार असल्याचे फडणवीस सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे. याचा अर्थ फडणवीस सरकारकडून कोरडवाहू शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ३५ हजार रुपये तर बागायतदार शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ५० हजार रुपये एवढी मदत केली जाणार आहे. शेती नुकसानीसाठी १८ हजार कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारने जाहीर केला आहे. अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे जमीनच वाहून गेल्याचे प्रकार घडले आहेत. ज्यांची जमीन खरवडून गेली आहे अशा शेतकऱ्यांना ४७ हजार रुपये प्रति हेक्टर या प्रमाणात मदत केली जाणार आहे. त्याचबरोबर मनरेगा योजनेच्या माध्यमातून जमीन खरवडून गेलेल्या शेतकऱ्यांना ३ लाख रुपये प्रति हेक्टर अतिरिक्त मदत दिली जाणार आहे. अतिवृष्टी आणि महापुरामुळे अनेकांच्या विहिरी गाडल्या गेल्या आहेत. अशा शेतकऱ्यांना गाडलेल्या विहिरींसाठी ३० हजार रुपये मदत केली जाणार आहे. अतिवृष्टी आणि महापुरामुळे रस्ते, पूल, विजेचे खांब यासारख्या पायाभूत सुविधांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या


दिल्या जाणार आहे. विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी, वीज पंपांच्या नुकसानीसाठी मदत, या पद्धतीचे निर्णयही फडणवीस सरकारने जाहीर केले आहेत. नैसर्गिक संकटाच्या काळात ६५ मिलिमीटर एवढा पाऊस झाला असेल तरच सरकारकडून अर्थसहाय्य केले जाते. ही अटही फडणवीस सरकारने यावेळी काढून टाकली आहे.

शेतकऱ्यांना झालेल्या आर्थिक आणि मानसिक त्रासाची संपूर्ण भरपाई कोणतेच सरकार करू शकत नाही तरीही देवेंद्र फडणवीस यांनी सरकारच्या माध्यमातून अधिकाधिक मदत देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच देवेंद्र फडणवीस हे राज्यातील बळीराजासाठी खऱ्या अर्थाने 'देवाभाऊ' ठरले आहेत. २०१७ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली होती. त्या कर्जमाफीचा फायदा गरजू शेतकऱ्यांना झाला होता. यावेळच्या संकटामुळे विरोधकांना फडणवीस सरकारवर टीका करण्यासाठी मोठे निमित्त मिळाले होते. मात्र फडणवीस सरकारने जाहीर केलेली ऐतिहासिक मदत पाहून विरोधकांची वाचा बसली आहे. ■

# भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुवर्ण युगाचा प्रारंभ

प्रत्येक देशाच्या विकास यात्रेत असा एक काळ येतो, ज्यावेळी तो स्वतःला पुनश्च नव्याने परिभाषित करतो आणि नवीन संकल्प करून पुढचे मार्गक्रमण करतो. या उत्सवाच्या कालावधीत पुढील पिढीतील जीएसटी सुधारणा त्या यशाचा मार्ग दाखवत असून त्या सुधारणा भारताच्या विकास यात्रेचा उत्सव बनल्या आहेत. ३० जून आणि १ जुलै २०१७ च्या मध्यरात्री संघराज्याचे एक अनोखे उदाहरण सादर करीत देशाने १७ वर्षांच्या कठोर संघर्षाचे वास्तवात रूपांतरण केले. आता आपल्या नवव्या वर्षात या परिवर्तनकारी सुधारणांचा उत्सव साजरा करताना २२ सप्टेंबर २०२५ पासून जीएसटी वस्तू आणि सेवा कर पध्दतीमुळे एका नवीन युगाचा प्रारंभ झाला आहे. सामान्य नागरिकांच्या जीवनात क्रांतीकारी परिवर्तन आणणाऱ्या, उद्योजकांचे जीवन सुकर करणाऱ्या आणि पुढची पिढी सक्षम करण्यास सहाय्यभूत ठरणाऱ्या केंद्र सरकारच्या या ऐतिहासिक निर्णयाने भारताच्या विकसित होत असलेल्या अर्थव्यवस्थेची नवीन गाथा सुरु झाली आहे.

**हा** सुधारणांचा उत्सव आहे. हा सातत्यपूर्ण धाडसी निर्णयांचा उत्सव आहे. एकूणच हा भारताच्या प्रगतीचा उत्सव आहे, जो समाजातील सर्व घटकांशी संबंधित कुटुंबांमध्ये आनंदाची लाट आणतो. ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या शुभप्रसंगी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारताला स्वावलंबी बनवण्यासाठी नेक्स्ट जनरेशन रिफॉर्म्स' (पुढील पिढीतील सुधारणा) करणे अतिशय गरजेचे आहे. दिवाळी आणि छठपूजेआधी त्यांनी पुढील पिढीतील जीएसटी सुधारणा भेट देण्याचे आश्वासन दिले होते. या दिवाळीपूर्वी क्रांतिकारी सुधारणा देखील अंमलात आणल्या जात आहेत. आता जीएसटी दरांचे टप्पे चार वरून मुख्यत्वेकरून केवळ दोन टप्प्यांमध्ये केले आहे. म्हणजे ५ आणि १८% असे दोनच टप्पे आता राहिले आहेत. निवडक चैनीच्या वस्तूंसाठी आणि नागरिकांना हानिकारक वस्तूंचे सेवन करण्यापासून परावृत्त करण्यासाठी ४०%चा



स्वतंत्र स्लॅब तयार करण्यात आला आहे. नवरात्राच्या पहिल्या दिवशीपासून म्हणजेच २२ सप्टेंबर २०२५ रोजी लागू झालेल्या या सुधारणांमुळे कोट्यवधी कुटुंबांचा आनंद द्विगुणीत झाला आहे.

आठ वर्षापूर्वी ३० जून – १ जुलै दरम्यान मध्यरात्री संसदेच्या मध्यवर्ती सभागृहातून जीएसटीची सुरूवात करण्यात आली, त्यावेळी अनेक दशकांचे स्वप्न साकार झाले होते. हे स्वतंत्र भारतातील सर्वात मोठ्या आर्थिक सुधारणांपैकी एक बनले. या आर्थिक क्रांतीमुळे देशाने आर्थिक समृद्धीच्या एका नवीन युगात प्रवेश केला. त्यामुळे देशाची असंख्य करांच्या जंजाळातून मुक्तता झाली. आता २१व्या शतकात भारत प्रगती करत असताना जीएसटीला पुढील पिढीतील सुधारणांची देखील आवश्यकता आहे, ज्या सातत्याने अंमलात आणल्या जात आहेत. जीएसटी २.० देशासाठी प्रगतीचा दुहेरी डोस म्हणून आला आहे. म्हणजे, एकीकडे यामुळे देशातील सामान्य कुटुंबांची आर्थिक बचत होईल तर दुसरीकडे त्यामुळे अर्थव्यवस्थेला नवीन मजबूती मिळेल. जीएसटी दरांमध्ये कपात केल्याने गरीब, नव–मध्यमवर्गीय, मध्यमवर्गीय, शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि तरुणांना मोठा फायदा होईल. पनीरपासून ते शॅम्पू आणि साबणापर्यंत सर्व काही पूर्वीपेक्षा अनेकपटीने स्वस्त होईल. यामुळे स्वयंपाक घरातील मासिक खर्चात लक्षणीय घट होईल. स्कूटर आणि चारचाकी गाड्यांवरील कर देखील कमी करण्यात आला आहे. यामुळे जे नुकतेच नोकरी करायला लागले आहेत त्या सर्व युवकांना याचा मोठा लाभ मिळेल. जीएसटीमध्ये कपात केल्याने नागरिकांना त्यांचे घरगुती अंदाजपत्रक आटोपशीर बनण्यास आणि जीवनशैली सुधारण्यास मदत होईल.

**मजबूत, पारदर्शक आणि सर्वसमावेशक सुधारणा**

**इच्छा + स्थैर्य = संकल्प**

**संकल्प + प्रयत्न = यश**

## स्वावलंबी भारताला बळकटी देण्यासाठी जीएसटीमध्ये सुधारणा




**जीएसटी केवळ सुलभ नसून जनतेसाठी लाभदायकही असला पाहिजे. लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून झालेल्या या घोषणेसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या जीएसटी सुधारणांचा पाया रचला. ज्यामध्ये तीन स्तंभ जोडले गेले, जेणेकरुन त्याचे लाभ जनता, शेतकरी, मध्यम वर्ग आणि सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांपर्यंत पोहोचतील. याशिवाय, ही सुधारणा केवळ स्वावलंबी आणि विकसित भारताच्या शिडीवरील आणखी एक पायरी नाही तर एक मजबूत उदयोन्मुख स्तंभ आहे.**

**संरचनात्मक सुधारणा**

■ संरचनात्मक सुधारणा करून चार स्लॅबचे दोन स्लॅबमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. या सुधारणा विरोधी शुल्क संरचनेत सुधारणा करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून करण्यात आल्या आहेत. ज्यामध्ये मानवनिर्मित वस्त्रोद्योग क्षेत्र आणि खत क्षेत्रासह वर्गीकरणाशी संबंधित विवादांचे निराकरण करण्यासाठी क्षेत्रनिहाय शुल्क सुसंगत बनविण्याचा समावेश आहे.

■ मानवनिर्मित वस्त्रोद्योग क्षेत्र आणि खत क्षेत्रासाठी इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चर? म्हणजेच विरोधी शुल्क संरचनेची समस्या सोडवण्यात आली आहे. नियमांचे पालन करणाऱ्या करदात्यांना परतावा सुलभरित्या उपलब्ध असेल तसेच खेळते भांडवल अडकून पडणार नाही. जीएसटी कायद्यात सुधारणा केल्या जातील ज्यायोगे कच्च्या मालावरील कर शुल्क उत्पादनावर लागणाऱ्या कर दरांपेक्षा अधिक असल्याने उत्पन्न इनपुट टॅक्स क्रेडिटच्या (ज्याला सामान्यपणे इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चर म्हणून ओळखले जाते) परतावा दाव्यांची तपशीलवार पडताळणी प्रलंबित राहत असल्याने आगाऊ स्वरुपात प्रदान करता येऊ शकेल. जोपर्यंत कायद्यात सुधारणा होत नाही तोपर्यंत केंद्रीय कर प्राधिकरण आपल्या अधिकाऱ्यांना सूचना जारी करेल की त्यांनी जोखीम विचारात घेऊन यंत्रणेच्या माध्यमातून निवडक करदात्यांना इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चर' च्या माध्यमातून दाखल केलेल्या दाव्यांमधून दाव्याच्या रकमेच्या ९०% आगाऊ परताव्याच्या स्वरुपात प्रदान करण्यात येईल.

■ या नियमांमध्ये सुधारणा करण्यात येऊन शून्य खर्चाच्या पुरवठा असलेल्या वस्तू किंवा सेवा अथवा दोन्हीच्या परताव्याच्या स्वरुपात दावा केलेल्या रकमेच्या विलंब परतफेड म्हणून दावा केलेला रकमेच्या ९०% पर्यंत मूल्याचा हंगामी परतावा स्वीकारण्याची तरतूद करता येऊ शकेल. योग्य प्राधिकरणाद्वारे जोखीम ओळख आणि मूल्यांकनाच्या आधारे ही आगाऊ परतफेड मंजूर केली जाईल.

■ कराशी संबंधित गोंधळ आणि विवाद कमी करण्यासाठी वस्तू आणि सेवांच्या वर्गीकरणात स्पष्टता आणण्यात आली आहे.

■ उद्योगांना सुयोग्य नियोजन करता यावे या उद्देशाने दीर्घकालीन स्थिर कर धोरण तयार केले आहे.

■ वस्तू आणि सेवा कर अपिलीय न्यायाधिकरण (GSTAT) डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यरत होईल.

**लाभ :** यामुळे करांची रक्कम किती होणार, याची मोजणी करणे सोपे होईल, वाद कमी होतील आणि व्यावसायिकांना नियमांचे पालन करणे सुकर होईल. न्यायाधीकरणाद्वारे कोणतेही वाद सहजरित्या सोडवता येतील.

## दरांचे सुलभीकरण

■ दर सुसूत्रीकरणामुळे बहुतेक वस्तू आणि सेवांसाठी जटिल बहुस्तरीय प्रणाली सुलभ झाली आहे.

■ या अंतर्गत ५%, १२%, १८ % आणि २८% (काही वस्तूंवरील उपकरांसह) ची जुनी रचना बदलून ५% गुणवत्ता दर (गरजेच्या आणि सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या वस्तूंसाठी), १८% मानक दर (बहुतेक इतर वस्तू आणि सेवांसाठी) अशा व्यापकपणे द्विस्तरीय प्रणाली लागू करण्यात आली आहे.

■ निवडक चैनीच्या वस्तूंसाठी ४०% चा विशेष दर निश्चित करण्यात आला आहे. हा विशेष दर या वस्तूंवरील जुन्या २८% हून अधिक उपकर (जिथे हे लागू आहेत त्याठिकाणी) स्लॅबची जागा घेतो.

■ या अंतर्गत ३९१ वस्तूंचे दर बदलण्यात आले, तर ३५७ वस्तूंवरील सध्या लागू असलेल्या जीएसटी दरात कपात करण्यात आली आहे.

**लाभ:** अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या मते, दर कपातीमुळे महसुलामध्ये अंदाजे ९३ हजार कोटी रुपयांचे घट होईल. तथापि, नवीन ४०% स्लॅबमुळे ४५ हजार कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळेल. ज्यामुळे जवळजवळ निम्म्यापर्यंत नुकसान भरपाई होईल. याशिवाय कमी किमतीमुळे ग्राहकांच्या खर्चात वाढ झाल्यानेदेखील हा तोटा भरून निघेल. अर्थव्यवस्थेला सुद्धा चालना मिळेल.

## राहणीमानातील सुलभता

■ यामध्ये राहणीमान आणि व्यवसाय सुलभ करण्यासाठी प्रक्रियात्मक सुधारणा लागू करणे समाविष्ट आहे.

■ छोटे व्यावसायिक आणि स्टार्टअप साठी नोंदणी प्रक्रिया डिजिटल आणि सोपी करण्यात आली आहे. अर्ज केल्यापासून तीन कामकाजाच्या दिवसात स्वयंचलित नोंदणी उपलब्ध होईल. याचा फायदा सुमारे ९६% नवीन अर्जदारांना होईल. हे देखील एक नोव्हेंबर २०२५ पासून लागू होईल.

■ कर परतावा भरण्यासाठी आता पूर्वमुद्रित अर्ज उपलब्ध आहेत ज्यामुळे चुका होण्याची शक्यता कमी होते आणि वेळेची बचत होत आहे. विशेषतः शुल्क परत करण्याच्या रचनेअंतर्गत येणाऱ्या निर्यातदारांना आणि व्यावसायिकांसाठी परतावा प्रक्रिया जलद आणि स्वयंचलित करण्यात आली आहे.

■ ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर वस्तू विकणाऱ्या लहान पुरवठादारांसाठी सरलीकृत नोंदणी. सध्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये वस्तू विकण्यासाठी त्यांना प्रत्येक राज्यात व्यवसाय पत्ता आवश्यक ठरत होता. आता त्यांच्यासाठी एक सुलभ नोंदणी प्रणाली स्थापित केली जाईल. याची तपशीलवार प्रक्रिया नंतर जीएसटी परिषदेला सादर केली जाईल.

**लाभ :** सुलभ आणि एकीकृत कर प्रणाली व्यवसाय करण्याचा खर्च कमी करते आणि निर्यातीला चालना देते. यामुळे भारत जागतिक बाजारपेठेत एक सशक्त आणि स्पर्धात्मक खेळाडू बनू शकतो. किरण मालापासून ते औषधांपर्यंत सर्व गोष्टी परवडणाऱ्या दरात उपलब्ध होत असल्याने सामन्य माणसाला फायदा झाला आहे.

तर नवीन प्रणालीमुळे उद्योगांनाही फायदा झाला आहे. केवळ दोन दुर लागू असल्यामुळे अनुपालन सुद्धा कमी होईल.

# आता स्वस्त होणार मुलांचे शिक्षण

**जीएसटी २.० अंतर्गत विद्यार्थी आणि पालकांना लक्षणीयरित्या दिलासा मिळाला आहे. पुस्तके, स्वाध्याय, नकाशे, पेन्सिल आणि नकाशे, चित्रकला साहित्य यासारख्या स्टेशनरी वस्तूवरील कर आता रद्द करण्यात आला आहे.**

**आता हे राहील करमुक्त**

- सर्व प्रकारचे नकाशे
- भिंतीवर टांगले जाणारे नकाशे
- भोगोलिक आराखडे
- पेन्सिल ७ पृथ्वीचा गोल
- शार्पनर ७ पेन्सिल
- क्रेयॉन (रंगीत पेन्सिल)
- रंगीत खडू
- चित्रकलेसाठीचा कोळसा
- शिंप्याचे खडू
- स्वाध्याय वह्या
- आलेख वह्या
- प्रयोग वह्या
- वह्या

आता १२% वरुन ०% पर्यंत कमी करण्यात आला आहे. तर खोड रबरवरील जीएसटी ५% वरून ०% झाला आहे.



**लाभ :** शिक्षणावरील खर्च कमी होईल. याचा थेट फायदा कुटुंबांना आणि विद्यार्थ्यांना होईल. यामुळे शैक्षणिक साहित्यावर कमी खर्च करावा लागेल.

कर प्रणालीच्या दिशेने घेऊन जाईल. जीएसटी परिषदेच्या ५६ व्या बैठकीत घेतलेला निर्णय केवळ सामान्य माणसाच्या जीवनात मोठा बदल घडवून आणणार नाही तर व्यापारी जगत आणि एकूण अर्थव्यवस्थेला एक नवीन दिशा देणार आहे. यावर्षी पंतप्रधान मोदी यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून सामान्य माणसाला सुविधा, उद्योजकांना बळ आणि अर्थव्यवस्थेला नवीन ऊर्जा देण्यासाठी जीएसटीमध्ये व्यापक सुधारणा करण्याचे आवाहन केले होते. नेक्स्ट जनरेशन जीएसटी हा संकल्प साकार करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक आणि निर्णायक पाऊल ठरणार आहे. या सुधारणांमुळे शेतकरी, लघु-कुटिरोद्योग, लघु व्यावसायिक, महिला, तरुण आणि मध्यमवर्गीयांना थेट दिलासा मिळेल. देशभरातील व्यवसाय सोपे आणि सुलभ होतील. दररोजच्या घरगुती वस्तू, शिक्षण, आरोग्य सेवा. कृषी उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्सि आणि ऑटोमोबाईल आधीपेक्षा अधिक स्वस्त होतील. या सुधारणांमुळे भारताची अर्थव्यवस्था अधिक मजबूत, पारदर्शक आणि समावेशक बनेल. या जनहितार्थ घेतलेल्या आणि धाडसी निर्णयामुळे केवळ विकसित भारताच्या उभारणीला गती मिळणार नाही, तर प्रत्येक कुटुंबाला लाभ होईल, प्रत्येक घर समृद्ध होईल. या सुधारणांमुळे राहणीमान आणि व्यवसाय सुलभता आणखी मजबूत व्हायला मदत मिळेल. यामुळे सामान्य लोकांना खर्च करताना कमी कर भरावे लागतील, ज्यामुळे क्रयशक्ती वाढेल. केंद्र सरकारच्या प्रस्तावावर आधारित जीएसटी परिषदेने निर्णय घेतला आहे की त्यांनी उचललेली पावले केवळ क्षणिक दिलासा देणारी नाहीत तर ती भविष्यातील पिढ्यांनाही सक्षम बनवणारी असतात.

# करमुक्त आरोग्य सेवेच्या दिशेने सरकार वाटचाल करत आहे

**आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत सुलभरितीने आणि किफायतशीर दरात पोहचवणे हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. वस्तू आणि सेवा करांमधील बदलांमध्येही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या दृष्टीकोनाचे सुस्पष्ट प्रतिबिंब दिसून आले.**

### आरोग्य आणि जीवन विमा आता वस्तू व सेवा कर मुक्त

आता वैयक्तिक टम लाईफ, यूएलआयपी, एनयूटी पेंशन, एंडाउमेंट पॉलिसी त्यासाठीच्या पुनर्विम्यासह तसेच खाजगी आरोग्य विमा पॉलिसी, फॅमिली फ्लोअर पॉलिसी, ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या पॉलिसी आणि त्यांचा पुनर्विमा वस्तू आणि सेवा कर मुक्त करण्यात आला आहे. यासाठी आधी १८% वस्तू आणि सेवा कराचा दर लागू होता.

### औषधांपासून ते वैद्यकीय उपकरणांपर्यंत सर्व स्वस्त

■ शल्य चिकित्सा, दंत चिकित्सा, पशु चिकित्सा, भौतिक किंवा रासायनिक तपासणीसाठी वापरल्या जाणाऱ्या अनेक वैद्यकीय उपकरणे व यंत्रसामग्रीवर आता १८% ऐवजी ५% वस्तू आणि सेवा कराचा दर.

■ वैद्यकीय उपकरणे आणि पुरवठा उपकरणे जसे की, मलमपट्टी, बॅन्डेज, रोगनिदान चाचणी संच, रीजेंट, रक्तातील सारख तपासणी संच (ग्लुकोमीटर), वैद्यकीय उपकरणे इत्यादींवरील वस्तू आणि सेवा कर आता १२% वरून कमी होऊन ५% झाला आहे.

■ आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथीसह इतर औषधे, जैव वैद्यकीय कचऱ्याचा निचरा अथवा विल्हेवाटीशी संबंधित सेवा, औषधनिर्माण उत्पादनातील जॉब वर्क, सुकामेवा तसेच मधुमेहासाठीचे विशिष्ट खाद्यान्न पदार्थांवरील वस्तू आणि सेवा कराचा दर १२% वरून कमी करत ५% करण्यात आला आहे.

■ ३६ जीवरक्षक औषधांवरील वस्तू आणि सेवा कर १२% ऐवजी शून्य, वैद्यकीय ऑक्सिजन तसेच थर्मामीटरवरील कर १२-१८% ऐवजी ५% झाला आहे.

■ चष्मा व सुधारात्मक चष्मे १२% ऐवजी ५% वस्तू आणि सेवा कराच्या स्तराअंतर्गत आली आहेत, तर व्यायामशाळा व तंदुरुस्ती केंद्रांवर आता १८% ऐवजी ५% वस्तू आणि सेवा कर असेल.

**फायदा :** औषधे, वैद्यकीय उपकरणे, पोषण आणि विम्यावरील कर कमी करण्यात आला आहे. आरोग्य सेवा सुलभ बनवण्याच्या दिशेने हे एक मोठे पाऊल आहे. यामुळे जगाचे औषधालय म्हणून भारताची भूमिका आता बळकट होईल. याचबरोबरीने चष्म्यावरील वस्तू आणि सेवा कराचा दर कमी केल्याने जवळपास १० कोटी लोकांना योग्य चष्मा उपलब्ध होत नसल्याची स्थिती बदलून आता चष्मे सहज उपलब्ध होतील.

### नागरिक देवो भव: मंत्र जपत, सतत सुधारणा

नागरिकांचे जीवनमान असो, सरकार असो किंवा संघटना असोत नदीच्या पाण्याप्रमाणे गतिशील आयुष्यच नवीन उर्जेचे प्रेरणास्थान बनते. जेव्हा जीएसटी पहिल्यांदा लागू करण्यात आला तेव्हा जागतिक अनुभव आणि केंद्र आणि राज्य सरकारांच्या वैचारिक चर्चामधून तो आकाराला आला. देशात आर्थिक एकात्मतेची सुरुवात झाली होती. त्यानंतर सुधारणांची एक अविरत प्रक्रिया सुरु राहिली आणि आता केंद्र सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलत जीएसटी प्रणालीमध्ये आमुलाग्र बदल केले आहेत. वास्तविकत; कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी कर प्रणाली महत्त्वाची असते. म्हणून कोणत्याही सरकारची खरी क्षमता तेव्हा तपासली जाते जेव्हा ती उत्पादनाला चालना देणारी, खर्चाला प्रोत्साहन देणारी यासोबतच देशाच्या महसुलात महत्त्वपूर्ण योगदान देणारी ठरते.

सरकारने 'एक राष्ट्र, एक कर असा दूरचा दृष्टिकोन ठेवून आठ वर्षापूर्वी आठ वर्षापूर्वी भारताने एक देश एक

> **आज देशात असे सरकार आहे जे राष्ट्रीय हितासाठी सर्वात मोठी जोखीम उचलण्यास तयार आहे. मागील सरकारांमध्ये राजकीय जोखीम घेण्याचे धाडस नसल्याने जीएसटी अनेक वर्षे रखडला होता. आम्ही केवळ जीएसटी लागू केला नाही तर आज आपण विक्रमी जीएसटी संकलन होत असलेले पाहत आहोत.**
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

**वस्तू आणि सेवा कर भारताच्या आर्थिक परिसंस्थेत मैलाचा दगड ठरला आहे. याद्वारे करांची संख्या, अनुपालनचा भार आणि सामान्य माणसावरील एकूण कराच भार कमी केला गेला आहे, त्याला समांतरपणे पारदर्शकता, अनुपालन आणि कर संकलनात मोठी वाढ झाली आहे.**

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

कर असा मांडलेला संकल्प पूर्णत्वाला नेत वस्तू आणि सेवा कर लागू केला. त्याआधी मूल्यवर्धित कर आणि अनेक प्रकारच्या करांची गुंतागुंतीची व्यवस्था अस्तित्वात होती. त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था मंदावलेली आणि विकेंद्रित झाली होती, तसेच राज्या-राज्यांमधील टोल केंद्रांवर लांबच लांब रांगा लागत होत्या. आता त्याऐवजी एकच एकीकृत बाजारपेठ आली आहे. यामुळे अर्थव्यवस्थेत निष्पक्षता, सुलभता आणि बळकटी आली आहे. केवळ आठ वर्षातच वस्तू आणि सेवा कराअंतर्गत करदात्यांची संख्या २०१७ मधील ६६ लाखांवरून वाढून आज १.५ कोटींपेक्षा जास्त झाला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये वार्षिक संकलन २२ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे. आता प्रत्येक महिन्याचे वस्तू आणि सेवा कर संकलन १.८ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे. हे प्रमाण या ऐतिहासिक सुधारणांची अंमलबजावणी होईपर्यंतच्या काळातले सर्वाधिक प्रमाण आहे. डेलॉइटने केलेल्या एका सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे की, सुक्ष्म-लचू-मध्यम उद्योगांचा समावेश असलेल्या ८५% व्यवसाय वस्तू आणि सेवा कराबद्दल समाधानी आहेत. यातून भारत या ऐतिहासिक वाटचालीत व्यापारी आणि ग्राहकांना सोबत घेऊन अधिक आधुनिक होऊ शकतो याची प्रचिती आली आहे.

सुधारणांच्या पुढच्या टप्प्यात वस्तू आणि सेवा कर प्रणाली आणखी सोपी करण्यात आली आहे. यात सामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेवले गेले आहे. खाद्यान्न पदार्थ आणि औषधांसारख्या आवश्यक गोष्टी तसेच इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमती खूप कमी करण्यात आल्या आहेत. याचबरोबरीने, कर रचनेतील त्रुटी दूर केल्या जात आहेत. छोटे व्यवसाय, निर्यातदार आणि स्टार्ट अप्ससाठी प्रक्रिया सुलभ केल्या जात आहेत. या सुधारणांमधून केंद्र सरकारच्या 'नागरिक देवो भव:'या दृष्टीकोनाची प्रचिती येते.

नागरिकांचे जीवमान सुलभ करणे, व्यापाऱ्यांना सक्षम करणे आणि भारताला आत्मनिर्भर बनवण्याच्या मार्गावर पुढे नेणे, हा याचा उद्देश आहे. केंद्र सरकार सुधारणा केवळ कागदावर मर्यादित ठेवत नाहीये, त्या उलट सूट आणि सवलती थेट ग्राहकांपर्यंत पोहोचतील हे सुनिश्चित करण्याचे काम करत आहे. प्रत्येक सूट आणि सवलत ग्राहकांपर्यंत पोहोचवून केंद्र सरकार दुकानदार आणि ग्राहक, व्यापारी आणि नागरिक यांच्यातील विश्वासार्हता दृढ करण्याचे काम करत आहे.

### सुधारणांचे पंचरत्न

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारानुसार जर वस्तू आणि सेवा करमध्ये झालेल्या या सुधारणांना थोडक्यात समजून घ्यायचा प्रयत्न केला, तर याद्वारे भारताच्या दिमाखदार अर्थव्यवस्थेसोबत पंचरत्ने जोडली गेली आहेत. पहिले म्हणजे, कर प्रणाली खूपच सुलभ झाली. दुसरे, भारताच्या नागरिकांची जीवनमान गुणवत्ता आणखी सुधारेल. तिसरे, उपभोग आणि प्रगती दोन्हींना नवी चालना मिळेल. चौथे, व्यवसाय सुलभता गुंतवणूक आणि नोकऱ्यांना बळ मिळेल. आणि पाचवे, विकसित भारतासाठी सहकारी संघराज्याची म्हणजेच राज्य आणि केंद्र सरकारची परस्पर भागीदारी आणखी बळकट होईल. या सुधारणा समजून घेण्यासाठी भूतकाळाची पाने उलटणेही आवश्यक आहे. एक वेळ अशी होती की तेव्हा देशात मोठ्या प्रमाणात कर द्यावा लागत होता.

स्वयंपाकघरातील सामान असो किंवा शेती - शेतकऱ्यांशी संबंधित गोष्टी असोत वा मग ओषधे, आणि इतकेच नाही तर जीवन विमासुद्धा, अशा अनेक गोष्टींवर वेगवेगळा कर द्यावा लागत होता. टूथपेस्ट, साबण, तेल इत्यादींवर ३१ टक्क्यांपर्यंत कर द्यावा लागत होता. जेवणाची ताटे, चमचा इत्यादींवर १८ ते २८ टक्के, मुलांच्या खाऊच्या गोळ्यांवर २१ टक्के, सायकलवर १७ टक्के कर द्यावा लागत होता. उपचार आणि तपासणीमध्ये १६ टक्के, फिरणे, हॉटेल बुकिंगसाठीही खूप जास्त कर द्यावा लागत होता. घरासाठी दूरचित्रवाणी संच, वातानुकुलन यंत्रांच्या खरेदीसाठीही ३१ टक्क्यांपर्यंत कर द्यावा लागत होता.

# दैनंदिन वस्तू स्वस्त झाल्याने सर्वसामान्य नागरिकांचा मोठा फायदा होणार

**गरजेच्या वस्तूंवरील वस्तू व सेवा कराचा दरांमध्ये कपात झाल्याने दैनंदिन वस्तू स्वस्त होतील आणि यामुळे घरगुती खर्चाचा भार कमी होईल. दरांमधील कपातीमुळे सामान्य ग्राहकांची क्रय शक्ती वाढेल, सोबतच उत्पादनालाही चालना मिळेल.**

■ उच्च तापमानाचे ((१११'१') दूध, आधीच पाकीटबंद केलेले आणि शिक्काकृत पनीर गोळा (छेना) किंवा पनीर, चपाती आणि पराठा आता वस्तू आणि सेवा कर मुक्त, आधी कराचा दर ५% होता.

■ टूथब्रश, टूथपेस्ट, टाल्कम पावडर, केसांचे तेल, शेविंग क्रीम, आफ्टर शेव लोशन, टॉयलेट सोपवर आता ५ टक्के वस्तू आणि सेवा कर.

■ टूथ पावडर, मेणबत्ती, दूध पाजण्याच्या बाटल्या, कपड्याची बॅग, छत्री, शिलाई मशीन, सायकल, बांबूपासून बनवलेले फर्निचर, कंगवा, हेअरपिन, डायपर, पिण्याच्या पाण्याची २० लिटरची बाटली, सोलर वॉटर हीटरसह घरगुती वापरातील बहुतांश वस्तूंवर वस्तू आणि सेवा कर १२% वरून कमी करून ५%.

■ वातानुकुलन यंत्र, भांडी धुण्याचे यंत्र, प्रोजेक्टर, सेट टॉप बॉक्स, ३५० सीसी किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेची मोटारसायकल २८% ऐवजी १८% वस्तू आणि सेवा कराचा दराच्या स्तराअंतर्गत व्हिनेगर, साठवलेले टोमॅटो आणि मशरूम, गोठवलेल्या भाज्या, साखरेत मुरवलेले भाज्या-फळे-सुकामेवा-फळांच्या साली किंवा वनस्पतींचे इतर भाग, जॅम, फळांची जेली यावर वस्तू आणि सेवा कराचा दर १२% वरून कमी करून ५% करण्यात आला आहे.

■ १ हजार रुपयांपर्यंतच्या पादत्राणांऐवजी आता २ हजार ५०० रुपयांपर्यंतच्या किंमतीच्या पादत्राणांवर ५ टक्के वस्तू आणि सेवा कर. २ हजार ५०० रुपयांपेक्षा जास्त किंमतीवर सध्याचा दर लागू राहणार.

■ १ स्वयंपाक घरातील वस्तूंवर लागणारा १२% वस्तू आणि सेवा कर आता ५% करण्यात आला आहे. तर चॉकलेटवर आधी १८% कर होता त्याऐवजी आता हा दर ५% असेल.

शेतकऱ्यांसाठी आवश्यक उपकरणेही १२-१४ टक्के कराच्या कक्षेत होती, पण आता हे सगळे भूतकाळातील पानांपुरतेच उरले आहे. केंद्र सरकारने २०१४ नंतर ज्याप्रकारे सुधारणांची मालिका सुरू करून त्यात सातत्य राखले आहे, त्यामुळे नागरिकांचे जगणे सुलभ झाले आहे.

स्टार्टअप्स, सुक्ष्म-लघू-मध्यम उद्योग, छोटे व्यापारी-उद्योजकांसाठी कर तर कमी झालाच आहे. त्याच बरोबरीने, काही प्रक्रियाही सुलभ केल्या गेल्या आहेत. यामुळे त्यांची सुल भताही आणखी विस्तारणार आहे.

## एक संघ म्हणून भारताचे अद्वितीप उदाहरण

वस्तू आणि सेवा कराची मूलभूत कल्पना काही अस्सल नव्हती. जगातील अनेक देशांमध्ये प्रयोग म्हणून याची अंमलबजावणी केली गेली आहे. अनेक तथ्ये लक्षात घेऊन त्याचे भारतीय प्रारुप विकसित करणे गरजेचे होते. भारत हा अनेक राज्यांचा एक असा संघ आहे, ज्यात केंद्र आणि राज्य दोन्हीही राजकोषीय किंवा आर्थिक दृष्टिकोनातून सुदृढ असणे अत्यंत आवश्यक आहे. भारत हा काही राज्यांचा महासंघनाही, म्हणूनच केंद्र सरकारच्या महसुलाच्या जोरावर राज्यांची महसूली स्थिती सुदृढ केली जाऊ शकत नाही.

अशा परिस्थितीत वर्ष २००० मध्येच, तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी देशातील बाजारपेठांना एका सूत्रात बांधण्याचा पाया घातला होता. भारताची विविधता आणि त्यातील गुंतागुंत लक्षात घेऊन पूर्णतः व्यवहार्य असेल असे वस्तू आणि सेवा कराचे प्रारुप तयार करण्यासाठी एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली.

मग वर्ष २००६ मध्ये तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणातून १ एप्रिल २०१० पासून वस्तू आणि सेवा कर लागू केला करण्याचा प्रस्ताव मांडला, पण ते शक्य झाले नाही.

# विकासाची गती आता आणखी वेगवान

**वस्तू आणि सेवा कर २.० अंतर्गत करांचे केवळ २ स्तर असल्याने व्यापार करणे सुलभ होईल, यामुळे इनपुट खर्चही कमी होईल. किंमती कमी झाल्याने मागणीतील वाढ ही केवळ घरगुती उत्पादनालाच नाही तर 'मेड इन इंडिया'लाही चालना देईल.**

### सुक्ष्म-लघू-मध्यम उद्योगांचा मार्ग सुलभ

■ नोंदणी आणि विवरणपत्र दाखल करणे सुलभ झाले, परतावा प्रक्रियेला वेगवान केले गेले आहे.

■ अनुपालनावरील खर्च कमी केला गेला आहे, यामुळे उद्योग व्यवसायांवरील, विशेषत: सुक्ष्म-लघू-मध्यम उद्योग आणि स्टार्टअप्सवरील भार कमी झाला आहे.

### घट बांधणे झाले स्वस्त



■ सिमेंटवरील वस्तू आणि सेवा कराचा दर २८% वरून कमी होऊन १८% झाला. संगमरवर/ट्रॅव्हर्टिन लाद्या, ग्रॅनाईट लाद्या, वाळू-चुना विटा, बांबूचे फ्लोअरिंग/जॉइनरी, पॅकिंग केसेस आणि लाकडी पळ्यांवरील वस्तू आणि सेवा कराचा दर १२% वरून कमी करून ५% करण्यात आला आहे.

**फायदा:** घर आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांचा खर्च कमी होईल, यामुळे घर खरेदी करणे अधिक परवडणारे होईल. स्थावर मालमत्ता क्षेत्रातली मागणी वाढेल, त्याचवेळी नवे रोजगारही निर्माण होतील.

### इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या किंमती घटल्या

■ सर्व प्रकारचे एलसीडी/एलईडी दूरचित्रवाणी संच आणि मॉनिटरवरील वस्तू आणि सेवा कराचा दर २८% वरून कमी करून १८% करण्यात आला आहे.

**फायदा :** भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन परिसंस्थेला बळकटी मिळेल, त्याचवेळी ग्राहकांना या वस्तूंसाठी कमी पैसे खर्च करावे लागतील.

---

नोव्हेंबर २००९ मध्ये पहिला मसूदा जारी करण्यात आला, याद्वारे वस्तू आणि सेवा कराच्या वैशिष्ट्यांविषयी माहिती दिली लेली. मार्च २०११ मध्ये याबद्दलचे विधेयक सादर केले गेले पण, राजकीय सहमती झाली नाही आणि १५व्या लोकसभेच्या विसर्जनासोबतच विधेयकही निरस्त झाले. २०१४ मध्ये केंद्रात नवे सरकार सत्तेत आल्यावर या प्रक्रियेला वेग दिला गेला. डिसेंबर २०१४ मध्ये विधेयक सादर झाले आणि मे २०१५ मध्ये लोकसभेत संमत झाले. राज्यसभेत या विधेयकाला निवड समितीकडे पाठवण्याचा निर्णय झाला. समितीने २२ जुलै २०१५ ला आपला अहवाल सादर केला. यानंतर राजकीय सहमतीसोबत १ ऑगस्ट २०१६ ला घटना दुरुस्ती विधेयक सादर केले गेले.

राज्यसभेत ३ ऑगस्ट २०१६ ला आणि मग ८ ऑगस्ट २०१६ ला लोकसभेत ते संमत झाले. अर्ध्याहून अधिक राज्यांच्या सहमतीच्या औपचारिक प्रक्रियेनंतर राष्ट्रपतींनी ८ सप्टेंबर २०१६ ला त्याची अधिसूचना जारी केली आणि

अशारितीने भारतात वस्तू आणि सेवा कराचा मार्ग मोकळा झाला. खरे तर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची आर्थिक उद्दिष्टे गाठण्यासाठी एकत्रीतपणे काम करणाऱ्या भारत देशाचा दृष्टीकोन मांडला होता. आज वस्तू आणि सेवा कराचे सर्वात मोठे यश हे आहे की वस्तू आणि सेवा कर परिषद एक अत्यंत यशस्वी आणि प्रभावशाली निर्णय घेणारी संघराज्यीय संस्था असल्याचे सिद्ध झाले आहे. राज्यांच्या अर्थमंत्र्यांनी संघराज्यीय प्रशासनाच्या बाबतीत इतिहास रचला आहे.

यापूर्वी वस्तू आणि सेवा कराचे प्रारुप महसूल केंद्रित होते. अशा वेळी एकल कर प्रणाली स्वीकारण्याच्या दिशेने

# मोटारवाहन क्षेत्राला मिळेल नवी गती

■ लहान कार, दुचाकी वाहने आणि त्यांच्या 'साईड कार'वरील वस्तू आणि सेवा कराचा दर २८% वरून कमी करून १८% करण्यात आला आहे. बस, ट्रक, तीनचाकी, सर्व प्रकारच्या वाहनांचे सुटे भागही २८% ऐवजी १८% वस्तू आणि सेवा कराच्या स्तराअंतर्गत असतील.

■ चालकासह १० किंवा त्यापेक्षा जास्त प्रवाशांच्या क्षमतेच्या जैव-इंधनावर चालणारी वाहने, १२०० सीसी क्षमतेपर्यंतची सीएनजी किंवा एलपीजी वाहने, ४,००० एमएमपर्यंत लांबीच्या १,५०० सीसी पर्यंतची डिझेल वाहने आणि मालवाहू वाहनांवर लागणारा २८% वस्तू आणि सेवा कराचा दर कमी करून १८% करण्यात आला आहे.

■ दुचाकींचे सुटे भाग, गाड्यांच्या सीट आणि वल्ह्याच्या नावेवरील वस्तू आणि सेवा कराचा दर २८% वरून कमी करून १८% करण्यात आला आहे.

**फायदा:** सर्व प्रकारच्या वाहनांच्या सुट्या भागांवर एकसमान १८ टक्के वस्तू आणि सेवा कर केला गेला असल्याने, वर्गीकरणाशी संबंधित वाद संपुष्यात येतील. छोट्या कार आणि दुचाकींवरील वस्तू आणि सेवा कर कमी झाल्याने मध्यमवर्गाला फायदा होईल तर उत्पादन क्षेत्रालाही चालना मिळेले. अनेक कंपन्यांनी कारच्या किंमती कमी करण्याची घोषणा केली आहे. अशा परिस्थितीत वाहनांची किंमत ७०-७५ हजार रुपयांपासून ते २ ते २.२५ लाख रुपयांपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे. मोटार वाहन उद्योग क्षेत्र प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे ३.५ कोटींहून जास्त लोकांना रोजगार देते.



पाऊल उचलत, राज्यांनी केंद्रीय विक्री कर संपुष्टात आणावे, असे सांगितले गेले होते. त्यावेळी राज्यांना केंद्रीय विक्री कर संपुष्टात आणण्याच्या बदल्यात काही वर्षापर्यंत भरपाई दिली जाईल, असे वचन दिले गेले होते. राज्यांनी त्यानुसार कार्यवाही केली, पण केंद्रीय विक्री कराच्या बदल्यात भरपाई देण्याचे वचन मात्र पूर्ण केले गेले नाही. जेव्हा मे २०१४ मध्ये अरुण जेटली यांनी केंद्रीय अर्थमंत्री म्हणून पदभार सांभाळला, तेव्हा सर्व राज्यांनी त्यांना ज्यावेळी केंद्रीय विक्री कराशी संबंधित यापूर्वीची भरपाई मिळेल तेव्हाच वस्तू आणि सेवा करावर चर्चा केली जाईल असे सांगितले. अशा परिस्थितीत नव्या सरकारने राज्य सरकारांचा विश्वास संपादन करत, त्यांना तात्काळ भरपाई दिली आणि यानंतर वस्तू आणि सेवा करावरची चर्चा पुढे सरकू शकली.

दुसरे आणखी एक कारण होते ते म्हणजे, वस्तू आणि सेवा कर पूर्णपणे लागू करण्यादरम्यान आपल्याला महसुली नुकसान सोसावे लागेल, अशी शंका राज्यांना वाटत होती. अशा परिस्थितीत राज्यांच्या नुकसानीची भरपाई कशी केली जाऊ शकते असा प्रश्न निर्माण झाला होता. खरे तर त्यांची मागणी योग्य वाटत होती, आणि याचे उत्तर माधी आधी काढले गेले नव्हते.

विशेषतः तामिळनाडू, गुजरात, महाराष्ट्र आणि कर्नाटकसारखी उत्पादनत क्षेत्रात असलेल्या राज्यांना याबद्दल खूप चिंता वाटत होती. त्यांनी स्पष्ट सांगितले होते की, भरपाई नाही तर वस्तू आणि सेवा कर नाही. अशा परिस्थितीत २०१४ नंतर नव्या केंद्र सरकारने वस्तू आणि सेवा कर परिषदेत विचारविनिमय करून राज्यांना काहीही महसूल नुकसान झाले तर पहिल्या पाच वर्षापर्यंत महसुलात १४ टक्के वाढ करण्यावर सहमती व्यक्त केली होती. ■

# अर्थव्यवस्थेची दमदार वाटचाल आणि स्वदेशीचा जागर

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात वस्तू आणि सेवाकराच्या (जीएसटी) दरामध्ये मोठी कपात होणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार जीएसटी दरांमधील कपात २२ सप्टेंबरपासून लागू झाली आहे. याच दरम्यान, 'गर्व से कहो ये स्वदेशी है' हे अभियानही देशभर मोठ्या उत्साहात सुरू झाले आहे.



**अमेरिकेने** भारतीय वस्तूंवरील वाढलेल्या आयात शुल्क, एच-१ बी व्हिसा शुल्कातील वाढ अशा निर्णयातून मोदी सरकारवर दबाव आणण्याचे प्रयत्न सुरू केल्याच्या पार्श्वभूमीवर जीएसटी दर कपातीचा निर्णय अंमलात आला. दर कपातीच्या या निर्णयाला पूरक असा स्वदेशीचा जागरही सुरू झाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी भारतीय अर्थव्यवस्था मृत झाल्याचे वक्तव्य आपली मानसिकता दाखवून दिली होती. भारतीय कृषी क्षेत्र अमेरिकेच्या शेतमालासाठी पूर्णपणे खुले करण्याची मागणी ट्रम्प प्रशासनाकडून करण्यात आली होती. ही मागणी शांतपणे फेटाळून लावत मोदी सरकारने ट्रम्प प्रशासनाच्या दबावतंत्राला कोणत्याही परिस्थिती भीक घातली जाणार नाही, असे स्पष्ट केले. ट्रम्प प्रशासनाने भारताबद्दल अवमानजनक भाषा वापरूनही त्याला त्याच भाषेत प्रत्युत्तर देण्याऐवजी मोदी सरकारने ठाम कृतीने उत्तर दिले. अमेरिकेने भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क दुप्पट केल्यामुळे भारताच्या निर्यातीवर मोठा परिणाम होणार, अशी भीती देशातील अनेक स्वयंघोषित अर्थतज्ज्ञांनी दाखविली होती. अमेरिकेचे दबावतंत्र एकीकडे कठोर होत असताना मोदी सरकारने वस्तू आणि सेवाकरात मोठा फेरबदल केला. वस्तू आणि सेवाकराचे ५ आणि १८ टक्के असे दोनच टप्पे राहतील, असे जाहीर करत मोदी सरकारने देशाच्या अर्थव्यवस्थेच्या इतिहासातील क्रांतीकारी ठरणाऱ्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू केली. कार, दुचाक्या, ट्रॅक्टर, टिलरसारखी शेतीची अवजारे, खते यासारख्या वस्तूंवरील जीएसटीवर मोठी कपात केल्यामुळे सर्वसामान्य भारतीय जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. जीएसटीमध्ये मोठी कपात केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणखी एक आनंदाची बातमी दिली आहे. आज देश जीएसटी बचत उत्सव साजरा करत आहे. मी तुम्हाला सांगू इच्छितो की आम्ही इथेच थांबणार नाही, असे म्हणत श्री. मोदी यांनी भविष्यात वस्तू व सेवा करात आणखी कपात होण्याचेही संकेत दिले आहेत.

जीएसटी दर कपातीची अंमलबजावणी सुरू झाल्यावर पहिल्याच दिवशी म्हणजे २२ सप्टेंबर रोजी चारचाकीच्या बाजारात विक्रीच्या नवनव्या विक्रमांची नोंद झाली. मारुती सुझुकीच्या ३० हजार गाड्या २२ सप्टेंबर रोजी विकल्या

गेल्या. ह्युंदाईच्या ११ हजार तर टाटा मोटर्सच्या १० हजार गाड्यांची विक्री एकाच दिवसात झाली. जीएसटी दर कपातीची अंमलबजावणी सुरू झाली असतानाच दुसरीकडे भारतात बनवलेल्या आयफोन-१७ ची विक्री १९ सप्टेंबर रोजी सुरू झाली. हा फोन खरेदी करण्यासाठी ग्राहकांच्या मोठ्या रांगा लागल्याचे दृश्य मुंबईसह अनेक शहरांमध्ये दिसले. ज्या अर्थव्यवस्थेची ट्रम्प प्रशासनाने हेटाळणी केली त्याच भारतात आयफोन-१७ सारख्या महागड्या फोनची खरेदी करण्यासाठी रांगा लागत आहेत. हे चित्र कार आणि महागड्या मोबाईलच्या विक्रीपुरते मर्यादित नाही. यातून भारतातील सर्वसामान्य नागरिकांच्या वाढत्या खरेदी शक्तीचे आणि दमदार अर्थव्यवस्थेचे दर्शन संपूर्ण जगाला घडले.




मोदी सरकारने आत्मनिर्भर भारत संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या निर्धाराने 'हर घर स्वदेशी, घर घर स्वदेशी' या अभियानाचा जागर सुरू केला आहे. भारतीय नागरिकांनी भारतात बनवलेल्या वस्तू खरेदी कराव्यात, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने करीत आहेत. भारतीय उत्पादकांनी, कारागिरांनी बनविलेल्या वस्तू खरेदी केल्यास भारतीय अर्थव्यवस्थेला मोठे बळ मिळेल. विदेशात बनविलेल्या अनेक वस्तू, उत्पादने सर्वसामान्य भारतीयांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी देशातील उत्पादकांनी, स्थानिक कारागिरांनी बनविलेल्या वस्तू आग्रहाने वापरणे सुरू केल्यास देशाचे सकल राष्ट्रीय उत्पादन लक्षणीय प्रमाणात वाढू शकेल. मोदी सरकारने याच उद्देशाने गेल्या ११ वर्षात देशांतर्गत उत्पादन वाढविण्यावर भर दिला आहे. महात्मा गांधींनी पुरस्कार केलेली खादी काँग्रेसच्या अनेक वर्षांच्या सत्ताकाळात दुर्लक्षित राहिली होती. मोदी सरकारने वेगवेगळ्या मार्गाने खादीची विक्री वाढावी यासाठी निर्धाराने प्रयत्न केले. या प्रयत्नांना चांगले यश मिळाल्याचे दिसून येत आहे. २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात खादी आणि ग्रामोद्योगाने १ लाख ७० हजार कोटी एवढा विक्रमी व्यवसाय केला. खादी कपड्यांची तडाखेबंद विक्री होत आहे. लघु आणि कुटीर उद्योगावर मोदी सरकारचा विशेष भर आहे.आत्मनिर्भर भारताचे आणि विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी देशातील लघु आणि कुटीर उद्योगाला महत्वपूर्ण भूमिका बजावावी लागणार आहे, या दृष्टीने मोदी सरकारने धोरणांची आखणी केली आहे.

दूरदृष्टीने घेतलेल्या अनेक निर्णयांमुळे मोदी सरकारच्या गेल्या ११ वर्षाच्या काळात संरक्षण उत्पादनांची निर्यात होऊ लागली आहे. सेमी कंडक्टर चीपसाठी अन्य देशांवर अवलंबून असलेला भारत आता या चीपची निर्मिती करणार आहे. इंडिया सेमी कंडक्टर मिशनअंतर्गत १० सेमीकंडक्टर कारखान्यांना मंजूरी देण्यात आली आहे. मोदी सरकारच्या दूरदृष्टीच्या निर्णयांना यश मिळत आहे, हे भारताच्या विकास दरावरून ठळकपणे अधोरेखित होत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) २०२५-२०२६ या वर्षात भारताचा विकासदर ६.४ ते ६.५ टक्के एवढा राहील, असे अनुमान वर्तवले आहे. २०२५-२०२६ या आर्थिक वर्षातील पहिल्या तिमाहीत भारताचा विकासदर ७.८ टक्के होता. जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताकडे पाहिले जात आहे. शेजारी देशांमधील यादवी, सत्तापालट, रशिया-युक्रेन युद्ध, ट्रम्प प्रशासनाने सुरू केलेले दबावतंत्र अशा पटावर भारतीय अर्थव्यवस्था दमदार वाटचाल करत आहे. या वाटचालीला अपशकून करण्याचे प्रयत्न सातत्याने होत असतानाही भारतीय अर्थव्यवस्था मोठ्या दिमाखाने जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याकडे वाटचाल करत आहे. ■

# जीएसटी बूस्टः सप्टेंबरमध्ये ट्रॅक्टर विक्रीत 45% वाढ!

> जीएसटी दरकपातीनंतर सप्टेंबरमध्ये भारतातील देशांतर्गत ट्रॅक्टर उद्योगात ४५.४९% ची उल्लेखनीय वाढ झाली आहे. ग्रामीण भागातील जोरदार मागणी आणि वाढत्या कृषी यांत्रिकीकरणांचे हे प्रतिबिंब मानले जात आहे. नवे जीएसटी दर आणि मान्सूनमुळे कृषी क्षेत्रात उत्साह अन् चैतन्य निर्माण झाले आहे. वाहन उद्योगाच्या आकडेवारीनुसार, ट्रॅक्टरच्या एकूण घाऊक विक्रीचे प्रमाण १ लाख ४६ हजार १८० युनिट्सवर पोहोचले. गेल्यावर्षी, सप्टेंबर २०२४ मध्ये १ लाख ५४२ ट्रॅक्टर विकले गेले होते. आघाडीच्या कंपन्या वर्षानुवर्षे लक्षणीय वाढ नोंदवत आहेत. काही ब्रँडना मात्र विक्री वाढत असूनही नव्या तंत्रज्ञान युगात दबावाचा सामना करावा लागत आहे.




### सप्टेंबरमधील ब्रँडवाईज ट्रॅक्टर विक्री

महिंद्रा अँड महिंद्रा ग्रुपने सप्टेंबर २०२५ मध्ये ६४ हजार ९४६ युनिट्स विकून आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे. गेल्यावर्षी ४३ हजार २०१ ट्रॅक्टर विकले गेले होते, म्हणजेच महिंद्राचा वार्षिक वाढीचा दर ५०.३३% आहे. त्यांचा ट्रॅक्टर बाजारातील वाटा ४२.९७% वरून ४४.४३% पर्यंत म्हणजे वार्षिक १.४६ टक्के वाढला आहे. प्रभावी डीलर नेटवर्क आणि वित्तपुरवठा पर्यायांच्या पाठिंब्याने अर्धशहरी आणि ग्रामीण बाजारपेठांमध्ये मजबूत मागणीने त्यांच्या सतत नेतृत्त्वात योगदान दिले. TFE ग्रुपने गेल्यावर्षी सप्टेंबरमध्ये विक्री झालेल्या १७ हजार ९८४ युनिट्सपेक्षा २७ हजार ५३० युनिट्सची विक्री नोंदवली आहे, जी ५३.०८% वाढ आहे. त्याचा बाजार हिस्सा ०.९५ टक्के वाढून १७.८९% वरून १८.८३% वर गेला आहे. कंपनी अनेक राज्यांमध्ये आपली पोहोच वाढवत आहे आणि मध्यम–अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरच्या वाढत्या मागणीचा फायदा घेत आहे. सोनालिकाने १७ हजार ९७१ युनिट्सची विक्री नोंदवली, जी सप्टेंबर २०२४ मधील १४ हजार ३०९ युनिट्सपेक्षा २५.५९%

## 'बीएमडब्ल्यू'च्या विक्रीत मोठी वाढ

**जीएसटी दरकपातीचा फायदा बीएमडब्ल्यू या अलिशान चारचाकी खरेदीलाही झाला आहे. जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत बीएमडब्ल्यूच्या ४ हजार २०४ कारची विक्री झाली. कंपनीची भारतातील आतापर्यंतची ही सर्वोच्च विक्री आहे.**

**नवरात्रीच्या काळात देशातील वाहन विक्री ३५ टक्क्यांनी वाढली आहे. यावर्षी नवरात्रीच्या काळात २.१७ लाख वाहनांची विक्री झाली. गेल्यावर्षी नवरात्रीच्या काळात १.६१ लाख वाहनांची विक्री झाली होती. सप्टेंबरमध्ये दुचाकी (बाईक) विक्री ७ टक्क्यांनी वाढली. सप्टेंबरमध्ये १२.८७ लाख दुचाक्या देशभर विकल्या गेल्या. गेल्यावर्षी नवरात्रीच्या काळात ६.१४ लाख दुचाक्या विकल्या गेल्या होत्या. यावर्षी नवरात्रीच्या काळात ८.३५ लाख दुचाक्या विकल्या गेल्या. २२ सप्टेंबर रोजी जीएसटी दरकपातीची अंमलबजावणी सुरू झाली. त्यानंतर ९ दिवस चारचाकी आणि दुचाकी खरेदीसाठी ग्राहकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली. २२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या काळात तब्बल ४ लाख वाहनांची विक्री झाल्याचे दिसून येत आहे.**



जास्त आहे. तथापि, सोनालिकाचा बाजारातील हिस्सा १४.२३% वरून १२.२९% पर्यंत घसरला, जो टॉप प्लेयर्समध्ये सर्वात मोठी घसरण आहे. विक्री वाढली असली तरी, सोनालिकाची वाढ उद्योगाच्या सरासरीपेक्षा मागे राहिली, ज्यामुळे त्याच्या विभागातील स्पर्धा तीव्र होत असल्याचे दिसून आले.

एस्कॉर्ट्स कुबोटाने सप्टेंबर २०२५ मध्ये १७ हजार ८०३ युनिट्स विकले, जे गेल्या वर्षीच्या ११ हजार ९८५ युनिट्सपेक्षा ४८.५४% जास्त आहे. त्यांचा बाजारातील वाटा ११.९२% वरून १२.१८% (+९.२६) पर्यंत किंचित वाढला. कंपनी स्पर्धात्मक बाजारपेठेत लवचिकता दाखवत युटिलिटी आणि उच्च एचपी ट्रॅक्टर विभागांमध्ये चांगली कामगिरी करत आहे. जॉन डीअरने ९ हजार २४० युनिट्स विकल्याची नोंद केली, जे सप्टेंबर २०२४ मधील ७ हजार ४ युनिट्सपेक्षा ३१.९२% जास्त आहे. व्हॉल्यूम वाढीनंतरही, त्याचा बाजार हिस्सा ६.९७% वरून ६.३२% पर्यंत घसरला, म्हणजेच ०.६५ टक्क्यांनी घट झाली. ही घसरण काही विशिष्ट विभागांमध्ये वाढती स्पर्धा आणि मंदावलेल्या मॉडेल रोलआउटचे संकेत देते. न्यू हॉलंडने ६ हजार ८२५ युनिट्सची विक्री नोंदवली, जी गेल्या वर्षीच्या ४ हजार ५०३ युनिट्सपेक्षा ५१.५७% जास्त आहे. त्याचा बाजारातील वाटा ४.४८% वरून ४.६७% पर्यंत वाढला आहे, जो मध्यम आकाराच्या ट्रॅक्टर खरेदीदारांमध्ये स्थिर वाढ दर्शवितो. व्हीएसटीने ३५७ युनिट्सची नोंद केली, जी गेल्या वर्षीच्या २६८ युनिट्सपेक्षा ३३.२१% वाढली. स्पर्धात्मक क्षेत्रात स्थिर कामगिरी दर्शविणारा त्याचा बाजार हिस्सा ०.२४% वरून ०.२७% पर्यंत किंचित वाढला.

इंडो फार्मच्या विक्रीत १७.८९% वाढ झाली. गेल्या वर्षीच्या ३४१ युनिट्सवरून यंदा सप्टेंबर विक्री ४०२ युनिट्सपर्यंत वाढली. तथापि, त्याचा बाजारातील वाटा ०.०६ टक्क्यांनी किंचित कमी झाला, जो ०.३४% वरून ०.२८% पर्यंत वाढला. हे उद्योगाच्या सरासरीपेक्षा मागे राहिलेल्या वाढीचे संकेत देते. एसडीएफने चांगली कामगिरी दाखवली. मागील वर्षीच्या ५५ युनिट्सच्या तुलनेत ५६.३६% वाढून ८६ युनिट्सवर पोहोचला. लहान आकार असूनही, त्यांनी आपला बाजार हिस्सा ०.०६% वर स्थिर ठेवला आणि चांगले परिणाम दाखवले. कॅप्टन ट्रॅक्टरने छोट्या ब्रँडमध्ये आघाडी घेतली. गेल्या वर्षीच्या १३८ युनिट्सवरून विक्रीत ७३.९१% वाढ होऊन २४० युनिट्स झाली. ब्रँडचा बाजारपेठेतील हिस्सा ०.१४% वरून ०.१६% पर्यंत किंचित वाढला, जो त्याच्या उत्पादनांची वाढती स्वीकृती दर्शवितो. प्रीतची विक्री सप्टेंबर २०२४ मध्ये ४२६ युनिट्सवरून ८.९४% ने वाढून ४७५ युनिट्सवर पोहोचली. तथापि, कंपनीचा बाजारातील वाटा ०.४३% वरून ०.३२% पर्यंत घसरला, जो स्पर्धकांच्या तुलनेत मंद गतीने वाढ दर्शवितो. CE ही एकमेव लहान उत्पादक कंपनी आहे, जिथे विक्रीत घट झाली. गेल्या वर्षी विक्रीत ३१८युनिट्सच्या तुलनेत ४.०९% घट होऊन ती ३०५ युनिट्सवर आली. स्पर्धात्मक बाजारपेठेत कंपनीला येणाऱ्या आव्हानांवरून त्याचा बाजार हिस्सा ०.३२% वरून ०.२१% पर्यंत घसरला. ■

# उबाठांनी अडवली, देवेंद्रजींनी प्रत्यक्षात आणली
# मुंबई मेट्रो - ३ ची विजयगाथा



● प्रकाश गाडे

> मुंबई मेट्रो-३ चा शेवटचा टप्पा म्हणजे फक्त लोकार्पण नव्हे, तर एक स्वप्न प्रत्यक्षात उतरण्याचा क्षण होता. देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाल्याच्या पहिल्या दिवसापासून मुंबईच्या रहदारीमुक्त, स्वच्छ आणि आधुनिक प्रवासाचे जे स्वप्न रेखाटले, त्याचे मूर्त रूप आता या मेट्रोच्या भव्य भूमिगत मार्गांमधून प्रत्यक्षात येताना दिसत आहे. मेट्रोचे प्रत्येक स्थानक, प्रत्येक सुरंग, प्रत्येक वातानुकूलित प्लॅटफॉर्म हा त्या दूरदृष्टीचा साक्षीदार आहे.

**मुंबई** भारताची आर्थिक राजधानी, पण दशकानुदशके वाहतुकीच्या गोंधळात गुदमरत आहे. रस्त्यांवर वाहनांच्या हॉर्नचा कल्लोळ, गर्दी, प्रदूषण, उशिरा कामावर, घरी पोहोचणारी माणसे यावर उपाय हवा होता. या स्थितीचा अनुभव घेतलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी स्वप्न पाहिले मुंबईकरांना सुरक्षित, जलद आणि आधुनिक प्रवास देण्याचे. मेट्रो ही केवळ रेल्वे नाही, ती मुंबईच्या भविष्याची रेषा आहे, असे त्यांनी स्पष्ट सांगितले आणि कामाला लागले.

मात्र मुंबई मेट्रो ३ प्रकल्प सुरु होण्यापर्यंतचा हा प्रवास मुळीच सोपा नव्हता. प्रकल्पात अनेक राजकीय अडथळे उभे राहिले. उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री झाल्या झाल्या पहिले काम कुठले केले असेल तर ते मुंबई मेट्रोच्या कामाला स्थगिती देण्याचे. २०१९ नंतर आरे कारशेडच्या नावाखाली




काम थांबवण्यात आले. हजारो कामगार बेरोजगार झाले, कोट्यवधींची उपकरणे निष्क्रिय पडली आणि मेट्रोच्या गाड्या गाडीतच थांबल्या. पर्यावरणाचे कारण पुढे करून विकास थांबवला गेला, पण ज्यांना विकासाची खरी किंमत कळते, त्यांनी हे केवळ राजकारण असल्याचे जाणले. देवेंद्र फडणवीस यांनी मात्र संयम सोडला नाही. सत्ता गेली तरी स्वप्न जिवंत ठेवले.

पुन्हा सत्तेत आल्यावर पहिल्याच बैठकीत त्यांनी ठरवले मेट्रो थांबवायची नाही, मुंबई थांबवायची नाही! आरे कारशेडचे काम पुन्हा सुरू करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि प्रत्यक्षात मेट्रो प्रकल्पाला नवी गती दिली. आज जेव्हा गिरगाव, काळबादेवी, सीएसएमटीसारखी स्टेशने पाहिली जातात, तेव्हा त्या देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यशैलीचा आणि दृढ निश्चयाचा पुरावा देतात.

ही स्थानके ही केवळ सिमेंट काँक्रीटची बांधकामे नाहीत तर हा एक ती भूमिगत चमत्कार आहे. जमिनीखाली ३० मीटर खोल तयार केलेली ही स्टेशने अत्याधुनिक तंत्रज्ञानाची उदाहरणे आहेत. प्रत्येक प्लॅटफॉर्म वातानुकूलित, सुरक्षित आणि पूर्णतः स्वयंचलित आहे. ट्रेन ५५ मिनिटांत अंधेरी, दहिसरहून कुलाबा गाठेल. ही केवळ आकडेवारी नाही, तर मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनातील क्रांती आहे. देवेंद्र फडणवीस यांची काम करण्याची शैली नेहमीच अडथळ्यांतून मार्ग काढण्याची आहे. न्यायालयीन प्रकरणे, आंदोलने, राजकीय आरोप या सगळ्यांवर उत्तर देताना त्यांनी कधीही विकासाची गती कमी होऊ दिली नाही. त्यांनी प्रशासनाला स्पष्ट आदेश दिले ही मेट्रो केवळ वाहतुकीचे साधन नाही, ती लोकांच्या जीवनमानात बदल घडवणारी योजना आहे.

मुंबई मेट्रोच्या भूमिगत ट्रॅकवरून निघालेली पहिली वातानुकूलित ट्रेन म्हणजे फडणवीस यांच्या निर्धार शक्तीचे आणि दूरदृष्टीचे फळ आहे. वाहतुकीत वेळ गमावणाऱ्या मुंबईकरांसाठी ही मेट्रो म्हणजे दिलासा आणि अभिमान दोन्ही आहे. लाखो लोक दररोज प्रवास करतील, वेळ वाचवतील, प्रदूषण कमी होईल आणि त्या प्रत्येक प्रवासात देवेंद्र फडणवीस यांच्या दृढनिश्चयाचा ठसा उमटलेला असेल. अनेकांनी अडथळे उभे केले, पण त्यांनी विकासाचा मार्ग सोडला नाही. आणि आज जेव्हा या भूमिगत मेट्रो स्टेशनांमध्ये घड्याळाचे काटे पुढे सरकत आहेत, तेव्हा मुंबईचे भविष्यही त्या वेगाने पुढे जात आहे. कारण एखाद्या शहराचा विकास हा केवळ इमारतीत नसतो तो नेतृत्वाच्या दृष्टिकोनात असतो. देवेंद्र फडणवीस यांनी दाखवून दिले की, सत्ता असो वा नसो, लोकसेवा म्हणजे वचनबद्धता आणि म्हणूनच आज मुंबई मेट्रो उभी आहे अडथळ्यांतून झगडत, भूमिगत सुरंगातून उगवत आणि विकासाच्या मार्गावर नेणारी. ही मेट्रो म्हणजे एक वचन पूर्ण झाले. ट्रॅफिकमुक्त, सुरक्षित आणि आधुनिक मुंबईचे स्वप्न आता वास्तवात उतरले आहे आणि या स्वप्नाचा खरा शिल्पकार एकच मेट्रो मॅन देवेंद्र फडणवीस. ■

# उद्धव ठाकरेंना शहरी नक्षलवाद्यांचा कळवळा!

● केशव उपाध्ये, प्रदेश मुख्य प्रवक्ते

‘राज्य सरकारने तयार केलेल्या जनसुरक्षा विधेयकावर उद्धव ठाकरेंनी दसरा मेळाव्यात कडाडून टीका केली, त्याअर्थी उद्धव ठाकरे यांचा पाठिंबा शहरी नक्षलवाद्यांना असून त्यांनी नक्षलवादी शक्तींची पाठराखण केली आहे वास्तविक या शक्तींचे स्वरूप ओळखून मनमोहन सिंग सरकारच्या काळात शहरी नक्षलवाद्यांच्या विरोधात कारवाई सुरू झाली होती; पण राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेत याच शहरी नक्षलवाद्यांचे पाठीराखे सहभागी होते.’ असे आक्षेप नोंदवणारे टिपण...



**नाका-तोंडात** पाणी गेलेला माणूस हात-पाय हलवून, ओरडण्याचा प्रयत्न करून जीव वाचविण्याची धडपड करत असतो. उद्धव ठाकरेंचे दसरा मेळाव्यातले भाषण म्हणजे त्याप्रमाणेच बुडणाऱ्या माणसाप्रमाणे आपला जीव वाचविण्यासाठी, आपले अस्तित्व टिकवण्यासाठीची अखेरची धडपड वाटत होती. ही केविलवाणी धडपड पाहून वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या ज्वलंत विचारांनी प्रेरित झालेल्या लाखो शिवसैनिकांच्या उपस्थितीत चैतन्याचा हुंकार भरणाऱ्या सभांचे स्मरण वारंवार होते.

## काँग्रेसशी कधीही समझोता नव्हता

वंदनीय बाळासाहेबांनी सत्तेचा हव्यास कधीच धरला नाही. सत्तेचा मोह नसल्यामुळे बाळासाहेबांनी आपल्या हिंदुत्वाच्या विचारधारेशी कधीच तडजोड केली नाही. अखेरच्या श्वासापर्यंत बाळासाहेबांनी राष्ट्रीयत्वाचा, हिंदुत्वाचा वसा जपला. त्यांनी या विचारधारेच्या विरोधात असणाऱ्या काँग्रेसशी, कम्युनिस्ट, समाजवादी विचारधारांशी कधीच राजकीय समझोता केला नाही. उद्धव ठाकरेंनी मात्र हिंदुत्वाचा, राष्ट्रवादाचा विचार चिरडण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींशी हातमिळवणी करून बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली दिली. बाळासाहेबांचे हिंदुत्वाचे विचार सोडायचे या अटीवरच काँग्रेस नेतृत्वाने आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी उद्धव ठाकरे यांना महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याचे मुख्यमंत्रीपद दिले. १९८९ पासून वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना आणि भारतीय जनता पार्टी यांची युती होती.

रामजन्मभूमी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना यांच्यात युती झाली होती. याखेरीज या युतीला देशात त्यावेळी सुरू असलेल्या खलिस्तानी दशतवाद्यांच्या हिंसाचाराचीही पार्श्वभूमी होती. भारताला अस्थिर, अशांत करण्याच्या पाकिस्तानच्या कारस्थानाचा एक भाग म्हणून त्यावेळी खलिस्तान समर्थकांना बळ देण्यात येत होते. खलिस्तानी अतिरेक्यांकडून त्यावेळी देशभर हिंसाचार घडविला जात होता. या हिंसाचाराला आटोक्यात आणण्यासाठी १९८४ मध्ये त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी अमृतसर येथील शीख धर्मीयांचे पवित्र स्थान असलेल्या सुवर्ण मंदिरावर लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. भारतीय लष्कराने सुवर्ण मंदिराला खलिस्तानी

अतिरेक्यांच्या तावडीतून मुक्त केले. याचा सूड म्हणून अतिरेक्यांनी इंदिरा गांधी, लष्करप्रमुख जनरल अरुणकुमार वैद्य यांची हत्या केली. खलिस्तानी अतिरेक्यांनी देशभर हिंसाचाराचा आगडोंब उसळवण्याचा प्रयत्न सुरू केला होता. त्यावेळी भारतीय जनता पार्टीने राष्ट्रहित लक्षात घेऊन इंदिरा गांधी यांना पाठिंबा दिला होता. हिंदू-शीख धर्मीयांत फूट पाडण्याच्या विरोधात भाजपा ठामपणे उभी होती.

हा इतिहास सांगण्याचे कारण म्हणजे उद्धव ठाकरेंनी दसरा मेळाव्यात भारतीय जनता पार्टीला विरोध करण्यासाठी नक्षलवादी शक्तींची पाठराखण केली. देशापुढे शहरी नक्षलवाद्यांचा मोठा धोका आहे. भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील वाढती ताकद सहन होत नसल्याने अनेक शक्तींनी भारतातील शहरी नक्षलवाद्यांच्या कारवायांना बळ देण्याचे उद्योग सुरू केले आहेत. त्यासाठी शहरांत सातत्याने अराजक, अशांतता पसरवण्यासाठी नक्षलवाद्यांनी वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न सुरू केले. खोट्या गोष्टी पसरवून विविध जाती धर्मीयांमध्ये वैमनस्य निर्माण करण्याचा कुटिल डाव आखला गेला.

## स्वयंसेवी संस्था काय करतात?

दुसरी गोष्ट म्हणजे स्वयंसेवी संस्थांची यातील भूमिका. या देशाचे इतके मोठे दुर्दैव आहे की या स्वयंसेवी संस्थांना कोणीही प्रश्न विचारत नाहीत, सगळ्यांचा समज हाच होता की स्वयंसेवी संस्था विधायक काम करतात. हा समज चुकीचा आहे. अनेक स्वयंसेवी संस्था अशा आहेत की ज्या समाजसेवा तर करत नाहीतच, पण धर्मांतर घडवून आणतात आणि त्याचबरोबर नक्षल्यांची भरती करतात. काही वर्षांपूर्वी भीमा-कोरेगाव येथे घडविलेला हिंसाचार वेगवेगळ्या जातींमध्ये संघर्ष पेटविण्याचे कारस्थान होते. अशा शक्तींना जेरबंद करण्यासाठी राज्य सरकारने जनसुरक्षा विधेयक तयार केले आहे. या विधेयकावर उद्धव ठाकरेंनी दसरा मेळाव्यात कडाडून टीका केली. राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेत याच शहरी नक्षलवाद्यांचे पाठीराखे सहभागी होते.

आपल्या देशाबद्दल, आर्थिक प्रगतीबद्दल परकीय संस्था कौतुक करीत आहेत. मात्र परदेशी मदतीवर पोसल्या जाणाऱ्या स्वयंसेवी संस्था देशात घडलेल्या काही नकारात्मक घटनाच वारंवार सांगत असतात. देशात कितीतरी सकारात्मक गोष्टी घडून आल्या आहेत त्याबद्दल कोणीही बोलत नाही. मार्क्सवादी आणि डाव्यांची रणनीती आहे की ते प्रत्येक गोष्टीची लिखित स्वरूपात नोंद ठेवतात. ते याच लिखित पुराव्यांच्या आधारे कपोलकल्पित कथा तयार करतात. या कथांच्या आधारे समाजातील वेगवेगळे जाती समूह, विविध धर्मीय एकमेकांच्या विरोधात कसे उभे राहतील, त्यातून सामान्य माणसाचा देशाच्या संविधानावरील, न्यायव्यवस्थेवरील विश्वास कसा उडेल यासाठी ही मंडळी प्रयत्न करतात. या शक्तींचे स्वरूप ओळखून मनमोहन सिंग सरकारच्या काळात शहरी नक्षलवाद्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्यास प्रारंभ केला होता.

## प्रतिज्ञापत्रातही 'शहरी नक्षलवाद'

शहरी नक्षलवाद हा पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादापेक्षाही जास्त धोकादायक आहे. आपल्या देशात राहून काही लोक देशविरोधात कट रचणाऱ्या लोकांना मदत करत आहेत. ते कुठेही असू शकतात. या अदृश्य शक्तींशी कसे लढायचे हा खरा प्रश्न आहे. २०११ मध्ये कबीर कला मंचच्या कार्यकर्त्यांना माओवादी असण्याच्या आरोपावरून अटक झाली. आर.आर. पाटील त्यावेळी गृहमंत्री होते. त्यांच्या नेतृत्वाखालीच ही कारवाई झाली होती. त्यावेळीही कबीर कला मंच आणि त्यांच्या समर्थकांनी हे लोक पुरोगामी आहेत आणि समतेची गाणी गातात म्हणून यांचा आवाज दाबला जातोय, यांचा नक्षलवाद्यांशी संबंध नाही असा प्रतिवाद केला. अशा परिस्थितीत आणि या सर्वांचा दबाव असूनही आर.आर. पाटील यांनी अटक केलेल्यांचा नक्षलवादाशी संबंध आहे आणि पोलीस कारवाई योग्यच आहे अशी ठाम भूमिका घेतली होती. सर्वोच्च न्यायालयापुढे २०१३ मध्ये त्यावेळचे केंद्रीय गृहमंत्री पी.चिदंबरम यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात शहरी नक्षलवाद्यांच्या देशविरोधी कारवायांची माहिती दिली होती.

जनसुरक्षा कायदा हा 'हम करे सो कायदा' असा आहे. तो तोडून-मोडून टाकला पाहिजे, असे उद्धव ठाकरे दसरा मेळाव्यात म्हणाले त्यावेळी त्यांच्यामागचा बोलविता धनी कोण आहे हे लक्षात आले. उद्धव ठाकरेंना आता याच शक्तींचे समर्थन करीत बसावे लागणार आहे. ■

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जनसंपर्क कार्यालयातील अनुभव यात्रा



● अरुण कणेर

अन्न वस्त्र आणि निवारा या मानवी जीवनाच्या प्राथमिक गरजा असल्या तरी, काळाच्या ओघात रोजगार, शिक्षण आणि वैद्यकीय सेवा या गरजांनी मानवाच्या जीवनात प्राथमिकता निर्माण केली आहे. त्यापैकी वैद्यकीय सेवा अत्यंत महत्वाची आहे. काळाच्या ओघात वैद्यकीय क्षेत्रात अनेक शोध लागले असले तरी, यापैकी कित्येक सेवा सामान्य जनतेच्या आर्थिक क्षमतेबाहेर आहेत. देवेंद्रजींच्या नागपूर येथील जनसंपर्क कार्यालयातून जनतेला अनेक वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात त्यांचा परिचय करुन देण्याचा हा एक प्रयत्न.

**विसाव्या** शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक महत्वाचे शोध लागले आणि या शोधांनी बऱ्याच महामारीवर विजय मिळविला असला तरी, काळाच्या कुशीत किती आजार लपले आहेत याचा शोध कोणत्याही शास्त्रज्ञास अजूनही घेता आला नाही. आजही निसर्गाने मानवाला आपली कक्षा पार करु दिली नाही. जेव्हा मानवाला अभिमान झाला की, आम्ही सर्व रोगावर मात केली आहे तेव्हा, निसर्गाने मानवाला त्याच्या मर्यादेची जाणीव त्याला करून दिली आहे. चार वर्षापूर्वी आलेल्या कोरोनाने सर्व जगाला कित्येक महिने चार भिंतींच्या आत बंदिस्त राहण्यास भाग पाडले होते आणि वैद्यकीय क्षेत्रात प्रगत असलेल्या अमेरिकेलाही त्याच्या वैद्यकीय क्षेत्रातील मर्यादेची जाणीव करुन दिली होती. यामुळे आपण निसर्गापुढे कमजोर असल्याची जाणीव



जगातील सर्वच शास्त्रज्ञांना झाली होती. गेल्या दोनशे वर्षाच्या काळात वैद्यकीय क्षेत्रात लागलेल्या नवनवीन शोधामुळे मानवाने बऱ्याच आजारावर मात मिळविली आहे आणि त्यामुळे मानवी जीवन मोठ्या प्रमाणात सुसह्य झाले आहे. हे सत्य मात्र कोणालाच नाकारता येत नाही. प्राचीन काळापासून चालू असलेल्या प्लेग, कॉलरा आणि देवीसारख्या रोगांवर मानवाने विजय मिळविला असला तरी, नव्या युगामध्ये बर्ड फ्लू, चिकन गुनिया आणि कोरोनासारख्या महामारीने वैद्यकीय क्षेत्रापुढे आव्हान निर्माण केले आहे. पृथ्वीवर जन्माला आलेल्या प्रत्येकांचा मृत्यू होणार हे त्रिकालबाधित सत्य असले तरी, आपला मृत्यू काही दिवसाकरिता पुढे ढकलण्याचा प्रत्येकाचा आणि त्यांच्या कुटुंबियाचा प्रयत्न असतो. जगातील प्रत्येक डॉक्टर उपलब्ध असलेले वैद्यकीय ज्ञान आणि साधनाच्या आधारे दुर्मिळातून दुर्मिळ आजारातून त्या रुग्णाला आजारातून बरे करण्याचा प्रयत्न करीत असतो, परंतु कित्येक वेळा आर्थिकदृष्ट्या कमजोर असलेला समाजातील वर्ग पैशाच्या अभावी इच्छा असतांनाही आपल्या जवळच्या व्यक्तीला वाचवू शकत नाही. अशावेळी नागपूरच्या नागरिकांना आधारवड ठरते ते देवेंद्र फडणवीस यांचे जनसंपर्क कार्यालय. या कार्यालयामध्ये अशा नागरिकांना केवळ वैद्यकीय सेवांच नव्हे तर, वैद्यकीय क्षेत्रातील कोणतीही मदत करण्याकरिता विशेष वैद्यकीय कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाद्वारे नागरिकांना २४X७ वैद्यकीय सेवा पुरविली जात आहे.

### वैद्यकीय सहायता कक्षाची कार्यप्रणाली

देवेंद्र फडणवीस यांच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये डॉ. गिरीष चरडे यांच्या नेतृत्वाखाली कित्येक वर्षापासून वैद्यकीय सहायता कक्षाचे कामकाज सुरु आहे. प्रत्येक सप्ताहातील दर मंगळवारी या कार्यालयामार्फत वैद्यकीय चिकीत्सा शिबीर आयोजित करण्यात येते. या शिबिरामध्ये नागपूरातील अनेक नामांकित डॉक्टर सेवा देण्याकरिता हजेरी लावतात. केंद्र शासनाने आर्थिकदृष्ट्या कमजोर असलेल्या कुटुंबांना वैद्यकीय उपचार मोफत मिळावे म्हणून पाच लाखापर्यतचे उपचार मोफत मिळावे म्हणून आयुष्यामान कार्ड प्रदान केले असले तरी, सर्वच प्रकारचे वैद्यकीय उपचार यामध्ये घेता येत नाही. या सर्व सुविधा नागरिकांना या कक्षाद्वारे पुरविण्यात येतात.

**वैद्यकीय चाचण्या :** दर आठवड्याला घेण्यात येणाऱ्या या शिबीरामध्ये येणाऱ्या रुग्णांच्या सर्व तपासण्या मोफत केल्या जातात. सर्वसाधारणपणे या बाहेर महागड्या असलेल्या तपासण्या करण्याकरिता या शिबीरामध्ये रुग्णाची गर्दी मोठ्या प्रमाणात असते. या ठिकाणी साठ पेक्षाही अधिक वैद्यकीय चाचण्या केल्या जातात. या कार्यालयात वैद्यकीय चाचण्या करण्याकरिता वाढत असलेली गर्दी लक्षात घेता देवेंद्रजींनी आपल्या वाढदिवसानिमित्ताने नागपूरामध्ये कोठेही नसलेली स्वयंचलीत वैद्यकीय चाचणी करण्याकरिता अत्याधुनिक मशीन येथे सुरू करण्यात आली आहे.

या मशीनद्वारे पायाच्या नखापासून ते डोक्याच्या केसापर्यतच्या सर्व चाचण्या काही सेकंदात केल्या जातात आणि या चाचण्यांचा अहवाल सुध्दा तात्काळ मिळतो किंवा रुग्णाच्या मोबाईलवर उपलब्ध करुन दिला जातो. या मशीनची सेवा आठवड्यातून दोन वेळा उपलब्ध करुन दिली जाते.

**(क्रमश:)**

# आंध्र प्रदेशात सर्वांत मोठे डेटा सेंटर उभारणार

## हजारो तरुणांना रोजगाराच्या संधी ; भारतात गुगलचे पहिले एआय हब

**आंध्र** प्रदेशात १५ अब्ज अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक; अदानी समूहासोबत सर्वांत मोठे डेटा सेंटर उभारणार; हजारो तरुणांना रोजगाराच्या संधी; 'एआय फॉर ऑल' मिशनकडे वाटचाल.

### भारत होणार डिजिटल महासत्ता

टैरिफमुळे अमेरिका आणि भारतामध्ये तणाव निर्माण झाला असतानाच अमेरिकेची तंत्रज्ञान कंपनी गूगल भारतात तब्बल १५ अब्ज अमेरिकी डॉलर्स (सुमारे १.२५ लाख कोटी रुपये) गुंतवणार आहे. पुढील पाच वर्षांत विशाखापट्टणम येथे एक कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) केंद्र उभारण्यासाठी ही गुंतवणूक करण्यात आली आहे. या प्रकल्पात अदानी समूहासोबत देशातील सर्वात मोठे डेटा सेंटर उभारले जाणार आहे. यामुळे आंध्र प्रदेशात ५,००० ते ६,००० थेट व २०,००० ते ३०,००० रोजगाराच्या संधी निर्माण होतील. हे 'एआय' केंद्र हे अमेरिकेबाहेरचे सर्वांत मोठे गूगल केंद्र असेल. या केंद्रात एक गिगावॅट क्षमतेचे डेटा सेंटर, स्वच्छ ऊर्जा सुविधा आणि फायबर ऑप्टिक नेटवर्क असेल. या प्रकल्पांतर्गत नवीन वीज वहन मार्ग, स्वच्छ ऊर्जा निर्मिती आणि ऊर्जा साठवण प्रणालींमध्ये सह-गुंतवणूक केली जाईल.

### प्रकल्पाची मुख्य वैशिष्ट्ये...

**एकूण गुंतवणूक :** १५ अब्ज डॉलर्स
**ठिकाण :** विशाखापट्टणम, आंध्र प्रदेश
**मुख्य भागीदार :** गूगल, अदानी समूह, भारती एअरटेल
**डेटा सेंटर क्षमता :** १ गिगावॅट
**थेट रोजगार :** ५,०००-६,०००
**एकूण रोजगारनिर्मिती:** २०,०००-३०,०००
**ऊर्जास्रोत :** स्वच्छ (हरित) उर्जा
**उद्दिष्ट कालावधी :** २०२६ ते २०३०

अदानी एंटरप्रायजेसने सांगितले की, तिची संयुक्त उपक्रम कंपनी अदानीकॉनेक्स आणि गूगल विशाखापट्टणममध्ये भारतातील सर्वांत मोठा 'एआय' डेटा सेंटर कॉम्प्लेक्स आणि नवीन हरित ऊर्जा पायाभूत सुविधा उभारतील.

### एअरटेल काय करणार?

या प्रकल्पाचा एक भाग म्हणून एअरटेल अत्याधुनिक केबल लँडिंग स्टेशन (सीएलएस) उभारणार आहे, जिथे गूगलचे नवीन आंतरराष्ट्रीय सबसी केबल्स जोडले जातील. एअरटेल या प्रकल्पासाठी उच्च क्षमतेचे फायबर नेटवर्क विकसित करेल. ■

> **ही गुंतवणूक 'विकसित भारत' या आपल्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. यामुळे तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण होईल, 'एआय फॉर ऑल' हे उद्दिष्ट साध्य होईल आणि भारत डिजिटल महासत्ता म्हणून अधिक बळकट होईल. नरेंद्र मोदी, पंतप्रधान यामुळे आम्ही आमचे अत्याधुनिक तंत्रज्ञान भारतातील उद्योग आणि वापरकर्त्यांपर्यंत पोहोचवू शकू, ज्यामुळे 'एआय' नवीन कल्पना आणि देशातील प्रगतीला गती मिळेल.**
> **- सुंदर पिचाई, सीईओ गूगल.**

# मोबाईल फोन निर्यातीत गतवर्षीच्या तुलनेत ९५ टक्क्यांची वाढ

**देशाची** मोबाइल फोन निर्यात सप्टेंबरमध्ये गेल्यावर्षीच्या तुलनेत ९५ टक्क्यांनी वाढून १.८ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाली आहे. ही माहिती इंडिया सेल्युलर अँड इलेक्ट्रॉनिक्स एसोसिएशन (आईसीईए) ने दिली आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर हे महिने पारंपरिकरीत्या निर्यातसाठी मंद महिने असतात, परंतु यावेळी या महिन्यातील मजबूत वाढ भारतातील उत्पादन वाढ दर्शविते. एप्रिल-सप्टेंबर दरम्यान मोबाइल फोन निर्यात १३.५ अब्ज डॉलर्स इतकी होती, जी गेल्या वर्षी याच कालावधीत ८.५ अब्ज डॉलर्स होती.

फोन निर्यात कुणाला? : अमेरिका, संयुक्त अरब अमिरात (यूएई), ऑस्ट्रिया नेदरलँड्स आणि ब्रिटन.

### अमेरिका ठरली बाजारपेठ

पहिल्या सहामाहीत अमेरिकेला अंदाजे ९.४ अब्ज डॉलरचे निर्यात झाले. या वाढीचे प्रमाण सुमारे २०० टक्के आहे. यावेळी निर्यातीत अमेरिकेचा वाटा ७० टक्के आहे, जो गेल्या वर्षी ३७ टक्के होता, असे समोर आले आहे. ■

# सव्वा लाख कोटींची शस्त्र खरेदी




**भारताने** २०२४-२५ या आर्थिक वर्षात सव्वालाख कोटी रुपयांची शस्त्रखरेदी केली आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितले की, स्वदेशी शस्त्रांच्या खरेदीतून देश आत्मनिर्भर होत आहे. बदलत्या युद्धतंत्रज्ञानाचा विचार करून सुरक्षेची तयारी सुरू आहे. २०४७ पर्यंत संरक्षणसिद्धतेत आत्मनिर्भर होण्याचे ध्येय आहे. यासाठी महत्त्वाच्या क्षमता विकसित करणे, निर्यातदार बनणे आणि नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितले की, भारताने २०२४-२५ या आर्थिक वर्षात देशांतर्गत बाजारातून तब्बल सव्वालाख कोटी रुपयांची शस्त्रखरेदी केली आहे. देशाचे बाह्य आणि अंतर्गत शत्रूंपासून संरक्षण करण्यासाठी स्वदेशी शस्त्रांची खरेदी करून भारत आत्मनिर्भरतेच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. दिल्लीतील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी देशासमोरील आव्हानांवर प्रकाश टाकला. राजनाथ सिंह यांनी स्पष्ट केले की, युद्धभूमीवरील बदलत्या परिस्थितीची सरकारला पूर्ण कल्पना आहे. विशेषतः आजकाल ड्रोन्सचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन सुरक्षेची तयारी केली जात आहे. देशांतर्गत शस्त्रास्त्रांच्या निर्मितीला गती देण्यात आली आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षात देशांतर्गत शस्त्रखरेदी ७४ हजार कोटी रुपये होती, जी आता सव्वालाख कोटींपर्यंत पोहोचली आहे. हा केवळ आकड्यांमधील फरक नसून, बदललेल्या मानसिकतेचाही पुरावा आहे, असे ते म्हणाले. गेल्या दहा वर्षांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वदेशी बनावटीच्या शस्त्रास्त्रांना अधिक प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यांच्याच पुढाकारामुळे लष्करी साहित्य देशातूनच खरेदी केले जात आहे, असे संरक्षणमंत्र्यांनी नमूद केले.

२०४७ पर्यंत संरक्षणसिद्धतेत आत्मनिर्भर होण्यासाठी राजनाथ सिंह यांनी तीन महत्त्वाचे मुद्दे सांगितले. पहिले म्हणजे, महत्त्वाच्या संरक्षण क्षमतांमध्ये उच्च दर्जाची आत्मनिर्भरता मिळवणे. दुसरे म्हणजे, संरक्षण क्षेत्रात भारताने एक संभाव्य निर्यातदार बनणे आणि तिसरे म्हणजे, नवनवीन युद्धतंत्रे आत्मसात करणे आणि त्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान मिळवणे.

युद्धक्षेत्रातील बदलत्या परिस्थितीची सरकारला पूर्ण कल्पना आहे. विशेषतः सध्याच्या काळात ड्रोन्सचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. युद्धक्षेत्रात त्यांचा वापर वाढला आहे. हे सर्व लक्षात घेऊन सुरक्षेची तयारी सुरू आहे. देशांतर्गत बाजारात शस्त्रास्त्रांच्या निर्मितीला वेग देण्यात आला आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षात देशांतर्गत शस्त्रखरेदी ७४ हजार कोटी रुपयांची होती. आता मात्र ती सव्वालाख कोटीपर्यंत पोहोचली आहे. हा केवळ आकडेवारीतील फरक नाही तर बदलत्या मानसकितेचा फरक आहे. स्वदेशी बनावटीच्या शस्त्रास्त्रांना अधिकाधिक प्राधान्य देण्याचे धोरण गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वीकारले आहे. त्यांच्याच पुढाकाराने लष्करी साधनसामुग्री देशातूनच खरेदी केली जात आहे. २०४७ पर्यंत संरक्षणसिद्धतेत आत्मनिर्भर होण्याची त्रिसूत्री सिंह यांनी सांगितली. प्रथमतः आपण महत्त्वाच्या संरक्षण क्षमतांबाबत उच्च कोटीची आत्मनिर्भरता प्राप्त करायला हवी. दुसरे म्हणजे संरक्षण क्षेत्रात आपण संभाव्य निर्यातदार बनायला हवे आणि तिसरे म्हणजे नवनवीन युद्धतंत्रे आत्मसात करणे. त्यासाठी आवश्यक तंत्रज्ञानाची प्राप्ती करणे. ■

# स्वसंरक्षणार्थ भारताचे मिशन सुदर्शन चक्र

## सीमावर्ती भागांच्या संरक्षणासाठी अत्याधुनिक एके-६३० तोफा

**शत्रूचा** हल्ला भारतीय हद्दीत पोहोचण्याच्या आधीच सीमेवर हवेतच त्याचा निःपात करण्यासाठी भारताने मिशन सुदर्शन चक्र हाती घेतले आहे. त्याच्या अंतर्गत आता भारत-पाकिस्तान सीमेवरील भारतीय गावे-वस्त्यांचे तसेच धार्मिक स्थळांचे रक्षण करण्यासाठी सहा एके-६३० (३० मिमी) तोफा खरेदी करण्यासाठी निविदा काढण्यात आल्या आहेत. त्यामुळे भारतीय सीमेपासून चार किलोमीटर लांब असतानाच शत्रूचा कुटिल वार हवेतच नष्ट करता येणार आहे.

विशेष म्हणजे सरकारी मालकीच्या ॲडव्हान्स्ड वेपन ॲण्ड इक्विपमेंट इंडिया लिमिटेड (एडब्ल्यूई आयएल) या कंपनीकडून भारतीय लष्कर या तोफा खरेदी करणार आहे. ही ३० मिमीच्या मल्टी-बॅरल मोबाईल एअर डिफेन्स तोफांची यंत्रणा आहे. त्यांची मारा करण्याची क्षमता खूप जास्त आहे, असे संरक्षण अधिकाऱ्यांनी सांगितले. या तोफांमुळे भारताच्या मिशन सुदर्शन चक्र मोहिमेला मोठे बळ मिळणार आहे. या तोफा या मिशनच्या आधारस्तंभ ठरणार आहेत.

ऑपरेशन सिंदूर दरम्यान आलेल्या अनुभवातून ही हवाई संरक्षण प्रणाली खरेदी करण्याची निविदा जारी करण्यात आली आहे. त्यावेळी पाकिस्तानी सैन्याने जम्मू-काश्मीर आणि पंजाबमधील नागरी वस्त्यांवर आणि धार्मिक स्थळांवर थेट हल्ले केले होते. त्यावेळी भारतीय लष्कराच्या आर्मी एअर डिफेन्सने ड्रोन आणि विमानांचा वापर करून पाकिस्तानी हवाई हल्ले हाणून पाडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी अलीकडेच गुजरातमधील भूज येथे आर्मी एअर डिफेन्सच्या तुकड्यांना भेट दिली. या तुकड्यांनी ऑपरेशन सिंदूर दरम्यान तेथे अनेक पाकिस्तानी हल्ले उधळून लावले होते.

मिशन सुदर्शन चक्र ही भारताची २०३५ पर्यंत एक व्यापक, बहुस्तरीय, स्वदेशी सुरक्षा कवच तयार करण्याची योजना आहे. यात विविध शत्रूच्या हल्ल्यांपासून प्रमुख स्थळांचे संरक्षण करण्यासाठी पाळत, सायबर सुरक्षा



आणि हवाई संरक्षण प्रणाली यांचा मिलाफ केला जात आहे. यंदा देशाच्या स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मिशन सुदर्शन चक्रची घोषणा केली होती. या मोहिमेचे उद्दिष्ट संरक्षण तंत्रज्ञानात स्वावलंबन वाढवण्यासाठी आत्मनिर्भर भारत उपक्रमांशी सुयोग्य सांगड घालणे हा आहे.

### शत्रूला धडकी भरवणाऱ्या तोफा

१) एके ६३० प्रणालीद्वारे शत्रूची मानवरहित हवाई ९ शत्रूची म वाहने जसे की, ड्रोन, रॉकेट, तोफांचा मारा यांना हवेतच निष्प्रभ करता येईल. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सीमा आणि नियंत्रण रेषेच्या जवळील भारतीय नागरिकांची गावे सुरक्षित राहतील.

२) या तोफांचा पल्ला म्हणजेच रेंज ४ किलोमीटरपर्यंत असेल, त्यांचा चक्रीय गोळीबाराचा दर प्रति मिनिट ३००० राऊंडपर्यंत असेल.

३) ही अत्याधुनिक संरक्षण प्रणाली ऑल वेदर म्हणजे सर्व हवामानांत काम करणाऱ्या इलेक्ट्रो-ऑप्टिकल फायर कंट्रोल सिस्टमद्वारे आपल्या लक्ष्यांचा शोध घेईल.

४) ही तोफांची प्रणाली ट्रेलरवर बसवली जाईल. उच्च गतिशीलता असलेल्या वाहनाद्वारे ती ओढली जाईल. ■

# अनाथ, दिव्यांगांची शासकीय सेवेत नियुक्ती

## अनाथ माला हिच्यासह नागपूर जिल्ह्यात ९४१ पदांवर युवा-युवती शासकीय सेवेत

**आजचा** दिवस सर्व अनाथ, दिव्यांग व्यक्तीचा मनात आत्मविश्वास निर्माण करणारा असून आमची माला नागपूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात रुजू होतांना पाहून मन भरुन आल्याची भावना पद्मश्री सन्मानित शंकरबाबा पापळकर यांनी व्यक्त केल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील अनुकंपा व सरळसेवा भरती प्रक्रियेला गती देऊन अत्यंत पारदर्शीपणे संपूर्ण राज्यात ही मोहीम यशस्वी राबविल्याबद्दल त्यांनी शासन व जिल्हा प्रशासनाप्रती गौरोद्गार काढले. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी या प्रेरणेचे स्त्रोत ठरणाऱ्या घटनेला स्वत: तिला सोबत घेऊन नियुक्ती देण्यात आलेल्या गृह शाखेत जाऊन तिच्या खुर्चीवर बसविले. अनेक आव्हानांवर मात करुन परीक्षेच्या माध्यमातून गुणवत्तेवर उभी राहिलेली माला ही खऱ्या अर्थाने युवकांची प्रेरणा व्हावी, अशा भावना व्यक्त करुन त्यांनी मालाला शुभेच्छा दिल्या. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, पापळकर यांच्या संस्थेला वेळोवेळी सहकार्य करणारे ज्येष्ठ संपादक श्रीमंत माने, प्राप्ती माने, रोटरी क्लबचे पदाधिकारी व विविध सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी आवर्जुन उपस्थित होते. विशेष म्हणजे तिचे पालकत्व स्विकारलेले शंकरबाबा पापळकर हे स्वत: तिला शासकीय सेवेत रुजू होताना साक्षीदार होण्यासाठी आले होते. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यभर ही मोहीम अत्यंत कमी कालावधीत यशस्वीपणे राबविली. दिनांक ४ ऑक्टोबर रोजी झालेल्या राज्यव्यापी सोहळ्यात संपूर्ण राज्यातून १० हजार ३०९ उमेदवारांना शासन सेवेतील नियुक्तीचे आदेश देण्यात आले. यात नागपूर जिल्ह्यातील एकूण ९४१ युवा-युवतींना अनुकंपा व सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती देण्यात आली. यातील अनाथ असलेल्या माला पापळकर हिने आपल्या अंधत्वावर मात करुन जिद्दीने निवड परीक्षेत यश साध्य केले. महसूल सहायकपदावर तिची निवड झाली.



### जी जबाबदारी दिली जाईल ती यशस्वीपणे पूर्ण करेन - माला पापळकर

शासकीय सेवेतील कर्तव्यनिष्ठेची जबाबदारी मी समजून घेतली आहे. कोणत्याही परिस्थितीत मी प्रामाणिक प्रयत्न करेल, अशी भावना माला पापळकर हिने व्यक्त केली. पहिली ते सातवी पर्यंतचे माझे प्राथमिक शिक्षण व नंतर परतवाडा येथील पदवीपर्यंतचे शिक्षण मला शासकीय संस्थेसह बाबांच्या मदतीने घेता आले. ब्रेल लिपीतून उच्च तंत्रज्ञानाचा अविष्कार ठरलेल्या ऑनलाईन क्लासेसला मला मोबाईलच्या माध्यमातून जुळता आले. यातूनच मी स्पर्धा परीक्षेचा सराव करायला शिकले. ब्रेल लिपीतून व्हाईस सर्चपर्यंतचा हा प्रवास माझ्या आत्मविश्वासाला बळ देणारा ठरल्याचे तिने सांगितले.

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अनाथ मालाला दिल्या शुभेच्छा

अनाथ असलेल्या मालाने आपल्या अंधत्वावरही यशस्वी मात करुन निवड परीक्षेच्या माध्यमातून शासकीय सेवेला घातलेली गवसणी! तिचे हे यश सर्वांसाठी प्रेरणादायी ठरावे अशा शब्दांत मंत्री बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील गोपनीय शाखेत माला पापळकरच्या जागेवर जाऊन तिला शुभेच्छा दिल्या. ■

# कागदी बाँडची झंझट संपली!

## राज्यात ई-बाँड चा वापर करणार : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**राज्यात** इलेक्ट्रॉनिक बाँडची सुरुवात झाली आहे. कस्टम अधिकाऱ्यांकडून तत्काळ पडताळणीमुळे फसवणुकीस ही आळा बसणार आहे. आधीच्या बॉण्डमध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने बदल किंवा रक्कम वाढ करणे शक्य होणार आहे. कस्टम अधिकारी व ग्राहकांच्या ई स्वाक्षरीमुळे व्यवहार अधिक सुरक्षित व पारदर्शक होणार आहे, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

### ई बाँड म्हणजे काय? त्याचे फायदे जाणून घ्या

■ महाराष्ट्र शासनाचे नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत, National E-Governance Services Limited (NeSL) व National Informatics Centre (NIC) या संस्थांच्या तांत्रिक सहाय्याने कस्टम ई-बॉण्ड या प्रणालीचा नुकतेच शुभारंभ झाला.

■ या नव्या प्रणालीमुळे आयातदार व निर्यातदारांना विविध व्यवहारांसाठी वेगवेगळे कागदी बॉण्ड देण्याऐवजी एकाच इलेक्ट्रॉनिक बॉण्डद्वारे सर्व प्रक्रिया पूर्ण करता येणार आहेत.

■ हे बॉण्ड्स प्रोव्हिजनल असेसमेंट्स, एक्सपोर्ट प्रमोशन स्कीम्स, वेअरहाऊसिंग, आणि मॅन्युफॅक्चरिंग इन बॉन्डेड वेअरहाऊसेस इत्यादींसाठी वापरता येतील.

■ ही प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल असून आयातदार/निर्यातदार ICEGTE पोर्टलवरून ई-बॉण्ड तयार करतील, तर NeSL द्वारे ई-स्टॅम्पिंग व ई-स्वाक्षरी होईल आणि अखेरीस कस्टम अधिकाऱ्याद्वारे ऑनलाईन पडताळणी होईल.

■ मुद्रांक शुल्कासह सर्व शुल्काचे भरणे संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने केले जाणार आहे.

■ महाराष्ट्र स्टॅम्प कायद्यानुसार निश्चित केलेले ५०० रुपयांचे शुल्क आता ऑनलाईन जमा करता येणार असून कागदी स्टॅम्पची आवश्यकता संपुष्टात येईल.

■ आधार आधारित ई-स्वाक्षरी होईल. आयातदार/निर्यातदार तसेच कस्टम अधिकारी या दोघांच्या ई-स्वाक्षरीमुळे व्यवहार अधिक सुरक्षित व पारदर्शक असेल.

■ कागदपत्रांची आवश्यकता पूर्णपणे दूर होऊन पर्यावरण पूरक दृष्टीने 'ग्रीन गव्हर्नन्स'कडे हे मोठे पाऊल असेल.

■ रिअल टाईम पडताळणीमुळे कस्टम अधिकाऱ्यांकडून तत्काळ पडताळणी व फसवणुकीस आळा घालता येईल.

■ ई बाँडमध्ये आधीच्या बॉण्डमध्ये आवश्यक ते बदल अथवा रक्कमवाढ इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच करता येणार आहे.

■ या प्रणालीमुळे सीमाशुल्क प्रक्रिया गतिमान होणार, व्यवसाय सुलभ होणार व शासनाच्या डिजीटल इंडिया तसेच Ease of Doing Business उपक्रमांना चालना मिळणार आहे.

### २० दिवसात प्रणाली विकसीत

ई-बाँडविषयी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महत्त्वाची माहिती दिली. महसूल विभागाअंतर्गत कस्टम डिपार्टमेंट यांच्याकडून ई बॉण्ड प्रणाली लागू झाली आहे. निर्मला सीताराम जी मुख्यमंत्री यांनी आपलं ज्या प्रणाली वर नव्हते आपले राज्य ज्या प्रणालीवर नव्हते. आता आपले राज्य ई बॉण्ड प्रणालीवर आलेले आहे, असे ते म्हणाले. २० दिवसांत ही प्रणाली विकसीत केल्याचे ते म्हणाले. आपला ई बॉण्ड आल्यामुळे ५० हजार कागदपत्रे आपल्याकडे आपल्या सिस्टिमवर राहतील. डिजिटल स्वाक्षरीच्या माध्यमातून हे सुरु राहणार. कागद छपाई वाचणार आहे. कागदोपत्री रेकॉर्ड पाहण्यापेक्षा ई बॉण्ड करार केला जाईल.

### ई-बाँड प्रणाली असणारे महाराष्ट्र १७ वे राज्य

कस्टम आल्यामुळे ५०० रुपयाची गरज नाही. व्यापारला १०० बनवायचे असतील तर आता ई बॉण्ड असणार आहे. स्टॅम्प पेपर घेऊन ठेवायची गरज लागणार नाही. ३० सेकंदात ई-बाँड तयार होईल. Manual पण असणार आहे. स्टॅम्प पेपर ही असणार आहे जर व्यापारांना ई बॉण्ड घ्यायच असेल ते करू शकतात. ■

# नाशिक भाजपा मध्य मंडल कार्यकारिणी घोषित

**भाजपा** नाशिक महानगर जिल्हा मध्य मंडलाची कार्यकारणी मंडल अध्यक्ष वसंत उशीर यांनी घोषित केली.

**नूतन कार्यकारणी पुढील प्रमाणे**

अध्यक्ष- वसंत उशीर, उपाध्यक्ष- रोहिणी रकटे, सचिन वाघमारे, ॲड.जयमाला गोऱ्हे, निलेश मोरे, रोहन जगताप, तुषार देवरे, सरचिटणीस- रवींद्र गांगुर्डे, विनोद येवले, चिटणीस- धनंजय पुरोहित, योगेश बक्षी, मंदार पिंगळे, संकेत ढिकले, हिंमत इंगळे, हर्षल भामरे, कोषाध्यक्ष- ललितकुमार नहार. युवा मोर्चा- अक्षय गांगुर्डे, महिला मोर्चा- संगीता जाधव, अनु.जाती मोर्चा- संकेत घाटे, आदिवासी मोर्चा - चंद्रकांत बांडे, किसान मोर्चा- आप्पासाहेब शिंदे, अल्पसंख्यांक मोर्चा- संकेत ओहोळ, ओबीसी मोर्चा- विशांत शेळके, कामगार प्रकोष्ठ- मंदार ढोमसे, उत्तर भारतीय प्रकोष्ठ- उमेशचंद्र कनोजीया, उद्योग प्रकोष्ठ- व्यंकटेश बागुल, व्यापारी प्रकोष्ठ - कुणाल अजबानी आदी. ■

# महिला मोर्चा इचलकरंजी कार्यकारिणी जाहीर

**महिला** मोर्चा इचलकरंजी पूर्व मंडल, पश्चिम मंडल यांची कार्यकारिणी पूर्व मंडल अध्यक्षा सीमा कमते, पश्चिम मंडल अध्यक्षा सपना भिसे यांनी जाहीर केली. पूर्व मंडल मोर्चा सरचिटणीसपदी संजिवनी पाटील, सविता जगताप, उपाध्यक्षपदी सरला घोरपडे, गिरीजा हेरवाडे, जयश्री शेलार, वर्षा कांबळे, संगिता तुरंबेकर, रुपाली कुचेकर, निर्मला मोरे, अनुराधा शेरखाने, भारती पाटील, शोभा भाट, चिटणीसपदी सीमा वाघ, संगीता हुग्गे, विद्या लवटे, निर्मला कुरुंदवाडे, पुजा भिलुगडे, सुरेखा लोखंडे, प्रियंका पोटे, शितल सुर्यवंशी, सुप्रिया मजले, ज्योती लाटणे, कोषाध्यक्षपदी मेघा भाटले, पश्चिम मंडल सरचिटणीस दिपाली लोटे, सुप्रिया शिंदे, उपाध्यक्ष अरुणा माने, शोभा कापसे, छाया तोडकर, अमिता बिरंजे, पूजा शिंदे, मानसी शेटके, योगीता दाभोळे, वंदना खामकर, चिटणीस संगीता घोरपडे, सविता माने, संध्या लायकर, मायेरा इनामदार, माधवी मुंडे, सारिका सोनावळे, विद्या सुतार आदी. ■

# कणकवली येथे प्रबुद्ध संमेलनाचे आयोजन

**संविधान** बदलणार, मनुचे राज्य येणार असा भावनिक विषय घेऊन देशातील शोषित घटकांना विशेषतः बौद्धांना भडकविण्याचे प्रयत्न झालेत, परंतु बौद्ध व शोषित समाजाचे संविधानावर व्यापक प्रबोधन करून संविधान कधीच कोणीच बदलू शकत नाही याची भक्कम तरतूद संविधानातच आहे. भविष्यातील याचा विपर्यास आणि त्यामुळे होणारे नुकसान हे कुठेतरी थांबले पाहिजे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते व उच्च न्यायालयाचे वकील, लेखक ॲड. संदीप जाधव यांनी कणकवली येथे केले. कणकवली येथील नीलम कंट्री साइड येथे आयोजित केलेल्या प्रबुद्ध संमेलनात, बोधगया: सत्य आणि विपर्यास या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. मिलिंद कुलकर्णी, प्रसन्ना देसाई, डॉ.गुरु गणपत्ये, डॉ.रामचंद्र चव्हाण, डॉ.सुहास बीले, वैभववाडी नगराध्यक्षा श्रद्धा रावराणे, उपनगराध्यक्ष प्रदिप रावराणे, प्राची तावडे, सानिका रावराणे, नेहा माईनकर, संगिता चव्हाण, मंदार रावराणे, सुरेश सावंत, मंडल अध्यक्ष दिलीप तळेकर,



अमित साटम, देवगड मंडल अध्यक्ष राजा भुजबळ, स्वरुप पाटणकर, मयुरेश गोखले, हर्षदा वाळके, दिनेश मुद्रस, अशोक कांबळे, देवदत्त कदम, समिर मुरवणे, जितेंद्र चिकोडी, सुदेश राणे, सुधीर झाट्ये आदी उपस्थित होते. या कार्यक्रमा दरम्यान वक्ते आणि लेखक ॲड. संदीप जाधव यांच्या बोधगया: सत्य आणि विपर्यास या पुस्तकाचे प्रकाशन प्रसन्ना देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन सिंधुदुर्ग भाजपाने केले होते. प्रारंभी डॉ.मिलिंद कुलकर्णी यांनी या कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. ■









प्रदेश सांस्कृतिक प्रकोष्ठतर्फे 'देवाभाऊ चषक २०२५' चे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या क्रिकेट स्पर्धेत मराठी नाट्य, चित्रपट आणि कलासृष्टीतील अनेक नामवंतांनी भाग घेतला होता. प्रकोष्ठचे प्रदेश सहसंयोजक संचित यादव यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. मेघा धाडे-पावसकर, अक्षया चितळे, निकेश राजपूत, दीपक गोडबोले, सुनील पगार यांनी आयोजनात सहभाग घेतला. ज्येष्ठ नेते आ. श्रीकांत भारतीय यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. अभिनेते ऋतुराज फडके यांच्या स्टार मराठा संघाने विजेतेपद मिळवले. वीर मराठा संघाने उपविजेतेपद मिळवले.




अमरावती- अतिवृष्टीग्रस्तांसाठी जीवनावश्यक वस्तूंचे सहाय्य घेऊन जाणारे ३ ट्रक झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री प्रविण पोटे-पाटील आदी.



मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाच्या नविन कार्यालयाचे उद्घाटन प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते पार पडले. यावेळी सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, सुहास माटे, योगेश आवळे यांच्यासह अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




मराठवाडा पदवीधर निवडणूकसाठी मतदार नोंदणी अभियान- उपस्थिती- माजी केंद्रीय अर्थराज्य मंत्री खा.डॉ.भागवत कराड, प्रदेश सरचिटणीस आ. संजय केनेकर, शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, कोचिंग क्लासेस प्रकोष्ठ प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. पांडुरंग मांडकीकर आदी.



प्रदेश कार्यालय सहसचिव भरत हिरालाल राऊत यांनी अतिवृष्टीग्रस्तांसाठी २५ हजार रु. चा धनादेश सुपूर्द केला.



पीएनजी ज्वेलर्स आणि आ. सुधीर गाडगीळ यांच्यातर्फे १० लाखांचा धनादेश देताना सिद्धार्थ गाडगीळ.



रमेशचंद्र बागडिया यांनी ५१ हजार रु. चा धनादेश सुपूर्द केला.



अशोक मते यांनी अतिवृष्टीग्रस्तांसाठी १ लाखांचा धनादेश सुपूर्द केला.



अक्षय फाटक यांनी १ लाख ११ हजार १११ रु. चा धनादेश सुपूर्द केला.



रामदास मेदगे यांनी अतिवृष्टीग्रस्तांसाठी १ लाख १ हजार रु. चा धनादेश सुपूर्द केला.



प्रेरणा वरपूडकर यांनी १ लाख ११ हजार रु.चा धनादेश सुपूर्द केला.



रत्नागिरी जिल्ह्यातील खेडचे माजी नगराध्यक्ष वैभव खेडेकर यांच्यासह सुरेश सावंत, विलास जाधव, सुबोध जाधव, संतोष नलावडे, मनिष खवळे, मिलिंद नांदगांवकर, संजय आखाडे, रहीम सहीबोले यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, माजी आ. विनय नातू, जिल्हाध्यक्ष सतीश मोरे, केदार साठे आदी.



आ. अरुण लाड यांचे सुपुत्र शरद लाड तसेच सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यांतील विविध पक्षांतील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आ. सुधीर गाडगीळ, आ.सत्यजीत देशमुख, आ.मनोज घोरपडे, पृथ्वीराज देशमुख, आ.अमल महाडिक, सांगली भाजपा जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, समित कदम आदी.



सोलापूर (सांगोला)– शेकापसह शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, रणजितसिंह नाईक–निंबाळकर, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार– सावंत, श्रीकांत देशमुख, शिवराज पुकळे, राजश्री नागणे, ब्रह्मानंद पडळकर, किसान मोर्चा प्रदेश सचिव माऊली हळणवर, भाऊसाहेब रुपनवर, संभाजी अलदार, दुर्योधन हिवरकर, आप्पासाहेब देशमुख, शिवाजी गायकवाड, पोपट गडदे, प्रशांत वलेकर आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com